दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २५९ । गुरुवार २ जुलै २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## विज्ञान व सहजयोग..




हि कुंडलिनी शक्ती आपल्या मध्ये ,सहा चक्र आहेत वर त्या सहा चक्राना भेदून शेवटी ब्रम्हरंध्राला भेदते . हि सहा चक्र मेडिकल सायन्स प्रमाणे ,कारण मेडिकल सायन्स काही आपली पाठीच्या कण्यामध्ये जाऊन बघू शकत नाही कि ह्या शक्तीचे जे पीठ आहेत किंवा हे एनर्जी सेंटर्स आहेत त्यांना जाऊन ते बघू शकत नाहीत . पण त्या मुळे जे बाहेर त्यांना दिसत ते ते लिहितात कि आपल्या मध्ये फ्लेक्ससेस आहेत . आणि ह्या फ्लेक्ससेस ना नाव आहेत . पण हे कशे कार्यान्वित होतात किंवा यांचा आपापसांमध्ये काय संबंध आहे ते त्यांना काही माहित नाही . तर जेव्हा हि कुंडलिनी तुमच्या मध्य मार्गातून सहा चक्रे भेदन करून वर येते तेव्हा ह्या चक्रांमध्ये देवता आहेत . इथेच घोटाळतात सगळे साईन्टिस्ट कि देवता कशे ?आम्ही देवताला मानत नाही . तुम्ही कशालाच मानत नव्हता पूर्वी . तुम्ही हे तरी मानत होता का कि घर्षणाने आग तयार होते . हे सुध्दा मानत नव्हता . ते सिध्द झाल्यावरच मानू लागलात ना . प्रत्येक गोष्ट सिध्द झाल्यावरच मानू लागले . आता आमच्या आजीला आम्ही सांगितलं कि लोक चंद्रावर पोहोचले . तर ती म्हणे कि नाही आम्ही हे मानत नाही . असकस शक्य आहे कि लोक चंद्रावर पोहोचले . कसे काय गेले . फोटो दाखवला तर ती म्हणते हे नाटक आहे . आता आपण अजून त्या आजीच्याच डोक्याने चाललो ,जे अद्यावत गोष्ट आहे तिला न बघता त्याच जुनाट पध्दतीने त्याच्याकडे बघितलं तर सायन्स मध्ये हे लक्षात येणार नाही कारण हि गोष्ट सायन्स च्या पलीकडची आहे . सायन्सच्या वरच सायन्स आहे हे . तेव्हा ह्या देवता म्हणजे आपल्या उत्क्रांती काळातले एकेक पाऊल आहे .

१५ डिसेंबर १९८८,पुणे

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# राज्यभरात पावसाचा कहर!

## मुसळधार पावसाने मुंबई, पुणे ठप्प

### मध्य महाराष्ट्र-विदर्भात अलर्ट जारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्रात मान्सूनने जोरदार हजेरी लावली असून गेल्या २४ तासांत मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि कोकण भागात पावसाने अक्षरशः कहर केला आहे. मुसळधार पावसामुळे रस्ते, रेल्वे आणि जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

सखल भागांत २ ते ३ फूट पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला असून नागरिकांना घराबाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

मुंबईत सकाळपासून सुरू असलेल्या पावसामुळे दादर, माटुंगा, सायन, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडूप, मुलुंड, अंधेरी आणि गोरेगाव परिसरात तुफान पाऊस पडला. अंधेरी सबवे अडीच फुट पाण्याखाली गेला. वीरा देसाई रोड, फिल्म सिटी रोड, संतोषनगर आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावरील जोगेश्वरी भागात २-३ फूट पाणी साचल्याने वाहनांची मोठी कोंडी निर्माण झाली. वरळी आणि चेंबूरमधील अनेक सखल भागांत पाणी घुसले.

संध्याकाळी घरी परतणाऱ्या लाखो मुंबईकरांना पूर्व द्रुतगती महामार्गावर घाटकोपर ते ठाणे दरम्यान प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. वसई-विरारमध्ये वाघराळ पाड्यात ३ दुचाकी आणि २ कार वाहून गेल्या. सुदैवाने एका कार चालकाने उडी मारून आपला जीव वाचवला. नालासोपारा, कल्याण आणि ठाण्यातील अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली. ठाणे महापालिका क्षेत्रात ८ तासांत ८२.७६ मिमी पावसाची नोंद झाली.हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यांत अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.



■नवी मुंबईतील सानपाडा परिसरात रस्ते नदीसारखे दिसत होते. सायन-पनवेल हायवेवर वाहतूक कोंडी झाली. रायगडमध्ये मुंबई-गोवा महामार्गावर पाणी साचले. पालघर जिल्ह्यात शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. मुंबई आणि पुण्यात झाडे कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली. चेंबूरमध्ये काल एका शाळकरी मुलाचा झाड पडून मृत्यू झाला होता.

# तांभेरेत पुन्हा मृतदेह आढळला!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी / झरेकाठी :** राहुरी तालुक्यातील तांभेरे गावाच्या हद्दीत असलेल्या चंद्रगिरी मळा परिसरात, वनविभागाच्या क्षेत्रातील बिरोबा डोंगराजवळ बुधवारी, सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

डोंगराजवळ मृतदेह पडलेला असल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांनी तातडीने याची माहिती राहुरी पोलिसांना दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ, पोलिस कॉन्स्टेबल बाबासाहेब शेळके, सूरज गायकवाड, राहुल यादव, प्रमोद ढाकणे, श्री. भोसले तसेच तांभेरे गावचे पोलीस पाटील बाळासाहेब मुसमाडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली, पोलिसांनी घटनास्थळाचा रितसर पंचनामा केला असून, मृतदेह ताब्यात घेण्याची व पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवण्याची कार्यवाही सुरू आहे. या घटनेबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती पोलिसांकडून समोर आलेली नाही. संबंधित व्यक्तीचा मृत्यू नेमका कसा झाला, याचे कारण **(पान ४ वर)**

# लोकवस्तीतच जुगार अड्ड्यांचे जाळे?

## भाडेतत्त्वावरील जागांमध्ये कथित अवैध धंदे

### विशेष मोहिमेची नागरिकांची मागणी

राष्ट्र सह्याद्री विशेष

भाग-३

क्राईम फाईल : अहिल्यानगर

गुन्हा, तपास आणि न्यायव्यवस्थेचा सखोल वेध

संपादक : करण नवले

**अहिल्यानगर :** शहरासह जिल्ह्यातील अनेक निवासी भागांमध्ये भाडेतत्त्वावर घेतलेल्या घरे, गाळे व बंद जागांमध्ये कथित जुगार अड्डे सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून पुढे येत आहेत. या प्रकारामुळे परिसरातील शांतता, सुरक्षितता आणि सामाजिक वातावरण बिघडत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली असून, पोलिसांनी विशेष मोहीम राबवून अशा ठिकाणांवर सातत्याने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही निवासी भागांत रात्री उशिरापर्यंत संशयास्पद हालचाली, अनोळखी व्यक्तींची वर्दळ आणि वाहनांची ये-जा वाढल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या कुटुंबांमध्ये सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त होत आहे.

अनेक नागरिकांना अशा प्रकारांबाबत माहिती असूनही तक्रार केल्यानंतर स्वतःलाच त्रास होईल किंवा दबाव आणला जाईल, अशी भीती असल्याने ते उघडपणे पुढे **(पान ४ वर)**

# मंगलाष्टक सुरू असतानाच बालविवाह रोखला

## उडान प्रकल्प, चाइल्ड हेल्पलाइनचे यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्यात १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह ऐन मंगलाष्टक सुरू असतानाच रोखण्यात स्नेहालय संचलित उडान प्रकल्प, चाइल्ड हेल्पलाइन, पोलीस प्रशासन आणि स्थानिक प्रशासनाला यश आले. या संयुक्त कारवाईमुळे एका अल्पवयीन मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचले.

उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम यांना एका जागरूक नागरिकाने हेल्पलाइनवरून बालविवाह होणार असल्याची माहिती दिली. त्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या सीमा जुनी यांच्या माध्यमातून तातडीने १०९८ चाइल्ड हेल्पलाइन, ११२ पोलीस आपत्कालीन सेवा, ग्रामसेवक व बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला. सर्व यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत हस्तक्षेप केला.प्रारंभी संबंधित कुटुंबीयांनी विवाह नसून केवळ साखरपुडा असल्याचा दावा केला. मात्र मुलीचे वय, उपलब्ध माहिती आणि सुरू असलेली विवाहाची तयारी लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी केली. बालविवाहाचे कायदेशीर परिणाम तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक दुष्परिणाम समजावून सांगितल्यानंतर कुटुंबीयांनी सहकार्याची भूमिका घेतली आणि विवाह थांबविण्यात आला.यानंतर संबंधितांचे जबाब नोंदवून पंचनामा करण्यात आला. तसेच पुढील समुपदेशन व आवश्यक कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित कुटुंबाला बाल कल्याण समिती, अहिल्यानगर यांच्यासमोर हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. मुलीच्या संरक्षणासाठी आणि शिक्षणासाठी उडान प्रकल्पामार्फत पुढील पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# वृद्धेश्वर येथे छापा : गांजा विक्री करणाऱ्या एकास अटक : पाच लाखाचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र वृद्धेश्वर येथे एका घरात छापा टाकून अंमली पदार्थ अर्थात तयार गांजा विक्री करणाऱ्यां एका व्यक्तीला अटक करण्यात आली असून या टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी तब्बल २० किलो ग्रॅम वजनाचा तयार गांजा जप्त केला आहे, या जप्त केलेल्या गांजाची किंमत ५ लाख २५० रुपये आहे. सदर व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखा व पाथर्डी पोलिसांनी संयुक्तपणे मोठी कारवाई केली आहे.


याबाबत पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, काल रात्री वृद्धेश्वर येथील करण्यात **(पान ४ वर)**

# राहुरीत पोलिस पंच म्हणून शिक्षकांची नियुक्ती

## शिक्षकांनी करायचं तरी काय काय?

### शिक्षक संघटनांचा संतप्त सवाल

विशेष प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** सध्या देशभरात जनगणना, राज्यात मतदार यादीच्या विशेष पुनर्पडताळणी (एसआयआर)चे काम, बीएलओची जबाबदारी आणि नव्या अभ्यासक्रमासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण अशी अनेक कामे सुरू आहेत. या सर्व कामांसाठी प्राथमिक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यातच आता राहुरी तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांची पोलीस ठाण्यात गुन्ह्यांच्या तपासासाठी पंच म्हणून नियुक्ती करण्यात आल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शिक्षकांनी नेमकं करायचं तरी काय? असा प्रश्न शिक्षक वर्गातून उपस्थित केला जात आहे.

एसआयआरच्या कामासाठी जिल्हाधिकारी आणि प्रांताधिकाऱ्यांनी अनेक शिक्षकांना शाळेतून कार्यमुक्त केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर आधीच परिणाम होत असताना आता शिक्षकांना पोलीस ठाण्यात पंच म्हणून हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राहुरी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी जयश्री कारले यांच्या स्वाक्षरीने हे आदेश जारी करण्यात आले असून, त्यासाठी गटविकास अधिकारी आणि पोलीस निरीक्षक, राहुरी यांच्या पत्रांचा संदर्भ देण्यात आला आहे. आदेशानुसार, जुलै २०२६ महिन्यात सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षेची तरतूद असलेल्या गुन्ह्यांच्या तपासासाठी पोलीस ठाणे, राहुरी येथे शिक्षकांची पंच म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित शिक्षकांना दूरध्वनीद्वारे सूचना मिळताच तातडीने पोलीस ठाण्यात उपस्थित राहावे लागणार आहे. तसेच दूरध्वनी आला किंवा नाही, याबाबतचा अहवाल दुसऱ्या दिवशी कार्यालयात सादर करणेही बंधनकारक करण्यात आले आहे.

आदेशात पुढे नमूद करण्यात आले आहे की, नियुक्त केलेल्या दिवशी शिक्षक पंच म्हणून उपस्थित राहिले नाहीत आणि त्यामुळे पंचनामा प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला, तर त्याची जबाबदारी संबंधित शिक्षकांवर राहील. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर याचा परिणाम होणार असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. जनगणना, एसआयआर, बीएलओची कामे आणि विविध प्रशिक्षणामुळे शिक्षक आधीच वर्गापासून दूर आहेत. अशा परिस्थितीत पोलीस ठाण्यातील अतिरिक्त जबाबदारी देणे योग्य नसल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. शिक्षकांच्या मानसिक तणावाचाही विचार करण्यात आलेला नसल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला आहे. अलीकडेच पाथर्डी येथे एका महिला शिक्षिकेच्या निधनाची घटनाही शिक्षकांवरील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर चर्चेत आली होती. त्यामुळे शिक्षकांऐवजी इतर विभागांतील कर्मचाऱ्यांची पंच म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी विविध शिक्षक संघटनांनी केली आहे. तसेच, गटविकास अधिकाऱ्यांनीही सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन जनगणना, एसआयआर आणि बीएलओची जबाबदारी सांभाळणाऱ्या शिक्षकांऐवजी इतर विभागांतील कर्मचाऱ्यांचा विचार करावा, अशी मागणी शिक्षक वर्गातून होत आहे.



# गुरूंची परीक्षा की व्यवस्थेचे अपयश?
## पेपरफुटी, टीईटी आणि शिक्षकांवरील वाढत्या ओझ्याचा वस्तुनिष्ठ वेध....




र ''गुरू ब्रह्मा, गुरू विष्णू, गुरू देवो महेश्वरः...'' हा श्लोक भारतीय संस्कृतीत गुरूला सर्वोच्च स्थान देतो. परंतु आजच्या वास्तवात शिक्षकाला मिळणारा सन्मान आणि त्याच्यावर लादल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्यांमध्ये प्रचंड विसंगती निर्माण झाली आहे. एका बाजूला देशाचे भविष्य घडविण्याची जबाबदारी शिक्षकांच्या खांद्यावर सोपवली जाते, तर दुसऱ्या बाजूला त्याच शिक्षकांना सतत परीक्षा, अशैक्षणिक कामे आणि प्रशासकीय निर्णयांच्या भोवऱ्यात अडकवले जाते. महा टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्याने ही विसंगती पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे.

अवघ्या चोवीस तासांवर परीक्षा असताना प्रश्नपत्रिका फुटल्याचा संशय निर्माण होतो आणि परीक्षा पुढे ढकलली जाते. याचा परिणाम केवळ सहा लाख उमेदवारांवर होत नाही, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर होतो. परीक्षेची तयारी करण्यासाठी आर्थिक, मानसिक आणि कौटुंबिक पातळीवर संघर्ष करणाऱ्या लाखो उमेदवारांच्या आशांवर एका क्षणात पाणी फिरते. प्रशासनाकडून ''पारदर्शकतेसाठी परीक्षा पुढे ढकलली'' असे सांगितले जाते; परंतु ही वेळच का यावी, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

राष्ट्रीय स्तरावर नीट परीक्षेच्या पेपरफुटीवरून सर्वोच्च न्यायालयापर्यंत वाद पोहोचले. देशभर परीक्षा सुरक्षेवर चर्चा सुरू होती. अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अधिक सतर्क राहणे अपेक्षित होते. मात्र, आवश्यक खबरदारी न घेतल्याने पुन्हा एकदा व्यवस्थेच्या तयारीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. चूक उमेदवारांची नव्हती, तरी शिक्षा त्यांनाच भोगावी लागली.

यापेक्षाही गंभीर प्रश्न म्हणजे टीईटीची सक्ती. न्यायालयीन आदेशानुसार अनेक शिक्षकांना ठराविक मुदतीत टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. शिक्षकांची गुणवत्ता वाढविण्याचा उद्देश निश्चितच योग्य आहे; परंतु गुणवत्ता मोजण्याची पद्धत न्याय्य असली पाहिजे. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी नियुक्त झालेला, हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविणारा शिक्षक आणि नुक[...] डी.एड.-बी.एड[...] पूर्ण केलेला तरुण उमेदवार यांना एकाच निकषावर मोजणे कितपत उचित आहे?

शिक्षकाचे मूल्यमापन केवळ वस्तुनिष्ठ प्रश्नपत्रिकेने होऊ शकत नाही. अध्यापन कौशल्य, विद्यार्थ्यांशी संवाद, बालमानसशास्त्राची जाण, पालकांशी समन्वय, शैक्षणिक नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकी या गुणांचे मूल्य कोणती परीक्षा ठरवणार? एखाद्या डॉक्टरचे मूल्यमापन केवळ लेखी परीक्षेने होत नाही, त्याचप्रमाणे शिक्षकाचेही होऊ नये.

यामध्ये आणखी एक मोठा विरोधाभास आहे. राज्यातील शिक्षकांना अध्यापनापेक्षा अशैक्षणिक कामांमध्ये अधिक गुंतवले जाते. निवडणुका, जनगणना, मतदार यादी पुनर्पडताळणी, विविध सर्वेक्षणे, शासकीय मोहिमा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि आता काही ठिकाणी पोलीस तपासासाठी पंच म्हणून नियुक्ती अशा जबाबदाऱ्या शिक्षकांवर सातत्याने सोपवल्या जात आहेत. वर्गात शिकवण्यासाठी वेळच मिळत नसेल, तर गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा कशी करायची?

याचा दुसरा परिणाम म्हणजे कोचिंग संस्कृतीचा वाढता प्रभाव. शाळांमध्ये शिक्षक प्रशासनाच्या कामात अडकले की विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. ही उणीव [...]ासाठी पालक खासगी [...]यांकडे वळतात. [...] प्रकारे शिक्षणातील [...]ंतर व्यवस्था [...]र्माण होण्यास केवळ शिक्षक जबाबदार नसून धोरणात्मक त्रुट्याही तेवढ्याच कारणीभूत आहेत.

'शिक्षण सेवक' [...] संकल्पनाही [...]चाराची मागणी [...] अनेक वर्षे अत्यल्प मानधनावर सेवा करणारे शिक्षक, नोकरीसाठी होणारा कथित आर्थिक व्यवहार, नियुक्त्यांमधील अनिश्चितता आणि त्यानंतर पुन्हा पात्रतेच्या परीक्षाया संपूर्ण चक्रामुळे शिक्षकांमध्ये असुरक्षितता वाढत आहे. समाज ज्या व्यक्तीकडून उच्च नैतिक मूल्यांची अपेक्षा करतो, त्या व्यक्तीला व्यवस्थाच अस्थिरतेत ठेवत असेल, तर त्याचा परिणाम शिक्षण व्यवस्थेवर होणारच.

मात्र, याचा अर्थ टीईटीसारख्या पात्रता परीक्षाच रद्द कराव्यात, असा अजिबात नाही. शिक्षणाची गुणवत्ता टिकविण्यासाठी शिक्षकांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन आवश्यक आहे. पण ते अधिक व्यापक, बहुआयामी आणि व्यवहार्य असले पाहिजे. अनुभवी शिक्षकांसाठी सेवाकाल, अध्यापन मूल्यांकन, प्रशिक्षण, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा अभ्यास आणि शाळास्तरीय निरीक्षण अशा अनेक निकषांचा विचार होणे गरजेचे आहे. नव्या उमेदवारांसाठी स्वतंत्र निकष आणि सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी स्वतंत्र मूल्यांकन पद्धती विकसित करणे ही काळाची गरज आहे.

तितकेच महत्त्वाचे म्हणजे परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व. प्रत्येक पेपरफुटीनंतर चौकशी समित्या नेमणे, काही अटकसत्रे होणे आणि पुढे सर्व काही विसरले जाणे, हा क्रम थांबला पाहिजे. प्रश्नपत्रिका सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल ट्रॅकिंग, जबाबदार अधिकाऱ्यांची निश्चित उत्तरदायित्व प्रणाली आणि दोषींवर जलद कारवाई याशिवाय विश्वास पुनर्स्थापित होणार नाही.

शिक्षक हा केवळ सरकारी कर्मचारी नाही; तो समाजाच्या भविष्याचा शिल्पकार आहे. त्याला सतत संशयाच्या, असुरक्षिततेच्या आणि प्रशासकीय ओझ्याच्या वातावरणात ठेवून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा करणे वास्तववादी ठरणार नाही. शिक्षकांची गुणवत्ता वाढविणे आणि त्यांच्या सन्मानाचे रक्षण करणे ही दोन्ही उद्दिष्टे एकाच वेळी साध्य होऊ शकतात, परंतु त्यासाठी धोरणांमध्ये संवेदनशीलता, न्याय आणि दूरदृष्टी आवश्यक आहे.

आज गरज आहे ती शिक्षकांची नव्हे, तर व्यवस्थेची परीक्षा घेण्याची. कारण सक्षम शिक्षक घडविण्यापूर्वी सक्षम आणि विश्वासार्ह शिक्षण व्यवस्था उभी करणे हेच खऱ्या अर्थाने ''अमृतकाळ''चे लक्षण ठरेल. अन्यथा ''गुरूंची परीक्षा'' हा शब्दप्रयोग कायम राहील; पण प्रत्यक्षात परीक्षा व्यवस्थेच्या अपयशाचीच होत राहील.

# आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करा : डॉ. नंदकुमार भुते



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** कपाशी उत्पादनातील नवे तंत्रज्ञान समजून घेत वेळेवर खते वेळेवर मशागत आणि वेळेवर पीक संरक्षण केल्यास कपाशी पिकापासून चांगले उत्पादन मिळेल यासाठी शेतकऱ्यांनी रोप वेडिंग बाबत सतर्क रहावे असे प्रतिपादन राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कापूस सुधार प्रकल्पाचे सहाय्यक कीटक शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भुते यांनी केले.

महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, पंचायत समिती राहाता आणि कृषी विज्ञान केंद्र (पायरेन्स), बाभळेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी दिनानिमित्त ''कापूस पीक व्यवस्थापन'' या विषयावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कापूस उत्पादन वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि शाश्वत शेतीला चालना देणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, पंचायत समिती राहाता येथील कृषी अधिकारी वाघिरे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. विलास घुले, डॉ. प्रियंका खर्डे, सज्जला लांडगे डॉ. विठ्ठल विखे, कैलास लोंढे आदींसह कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

यावेळी डॉ. भुते यांनी कापूस पिकातील आधुनिक लागवड तंत्रज्ञान, संतुलित खत व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन तसेच अधिक उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या शिफारशीत तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती दिली. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर कापूस पिकाचे शाश्वत व्यवस्थापन कसे करावे, याविषयीही त्यांनी मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली.

प्रशिक्षणादरम्यान उपस्थित तज्ज्ञांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा स्वीकार, वेळेवर पीक निरीक्षण आणि शास्त्रशुद्ध व्यवस्थापन यामुळे उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढू शकते, असे सांगितले.
या कार्यक्रमाला कृषी विभागाचे अधिकारी, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, कृषी सहाय्यक तसेच राहाता तालुक्यातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. प्रशिक्षणानंतर शेतकऱ्यांनी विविध शंकांचे निरसन करून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी विस्तार विभागाच्या डॉ. प्रियंका खर्डे यांनी केले.

# श्री संत सावता माळी सोसायटीची १००% वसुली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** येथील श्री संत सावता माळी वि. वि.कार्यकारी सोसायटीची स्थापनेपासुन कर्जाचा १०० टक्के वसुल देण्याची परंपरा गेली १५ वर्षांपासुन आहे. माजी आमदार स्व. जयंतराव ससाने, स्व. भाऊसाहेब दाभाडे दिवंगत चेअरमन स्व. एकनाथ लोखंडे यांनी घालुन दिलेला आदर्श पुढे सुरु ठेवत संस्थेने यावर्षी ३१ मार्च अखेर बँक पातळीवर १०० टक्के वसुल दिला होता तर ३० जुन अखेर संस्था पातळीवर १०० टक्के वसुल देवुन १०० टक्के वसुलाची परंपरा कायम राखली आहे.



श्रीरामपुर तालुक्याच्या पुर्व भागातील महत्वाच्या आसलेल्या टाकळीभान येथील श्री संत सावता माळी वि.वि.कार्य. सेवा सोसायटीची गेली १५ वर्ष शंभर टक्के वसुल देण्याची परंपरा आहे. माजी आ. स्व जयंतराव ससाने संस्थेचे संचालक आसताना त्यांनी संस्थेला ही शिस्त लावली आहे. संस्थेचे चेअरमन स्व. एकनाथ लोखंडे, जेष्ठ संचालक स्व. भाऊसाहेब दाभाडे व चंद्रकांत लांडगे यांनी हा आदर्श संस्थेत रुजवण्यासाठी प्रथम पासुन प्रयत्न केले. स्व. जयंतराव ससाने यांच्यानंतर नगराध्यक्ष तथा जिल्हा सह. बँकेचे माजी संचालक करण ससाने यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था प्रगतीपथावर आहे. ३१ मार्च रोजी संस्थेच्या सर्व कर्जदार सभासदांनी घेतलेल्या ७४.७१ उचल केलेल्या कर्जाचा संपुर्ण भरणा करुन संस्थेने बँक पातळीवर १०० टक्के वसुल बँकेला दिला होता. तर काल ३० जुन रोजी उर्वरीत कर्जाचा भरणा करुन सदर संस्था संस्थापातळीवर १०० टक्के वसुल देणारी संस्था ठरली आहे. व याकामी जिल्हा बँकेचे शाखाधिकारी भरत क्षिरसागर, लिपिक सुहास भागवत, जयश्री परदेशी, दत्तात्रय सोमासे, कशिआर प्राजक्ता राजभोज, संस्थेचे सचिव रामनाथ ब्राम्हणे, विठ्ठल बनकर, रवि शिरसाठ, रघुनाथ शेळके यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वसुली कामी संस्थेचे चेअरमन बाबासाहेब तनपुरे, व्हा चेअरमन शिवाजी शिरसाठ, जेष्ठ संचालक बाबासाहेब बनकर, चंद्रकांत लांडगे, विलास दाभाडे, प्रकाश दाभाडे, बाबासाहेब लोखंडे, भारत भवार, मोहन रणनवरे आदींनी विषेश परीश्रम घेतले. सत्कार प्रसंगी टाकळीभान सोसायटीचे माजी चेअरमन एकनाथ पटारे, सचिव पाराजी पटारे, सिताराम कर्जुले, लहान भाऊ बनकर, अशोक बनकर आदी उपस्थित होते. सर्व सभासदांच्या सहकार्यामुळे १०० टक्के वसुलाची परंपरा कायम राखता आल्याची प्रतिक्रीया यावेळी संचालकांच्या वतीने देण्यात आली. शाखाधिकारी क्षिरसागर यांनी संचालक मंडळाचा सत्कार करुन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# वांबोरीत ससे कुटुंबियांचा शिक्षणासाठी आधार; शाळेसाठी जागेचे दान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** ग्रामीण भागातील शिक्षणाची परंपरा अबाधित राहावी आणि कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या उदात्त हेतूने वांबोरी येथील ससे-गांधले वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी दत्तात्रय ससे व मंगेश दत्तात्रय ससे यांनी ५ गुंठे जागा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

वांबोरी येथील ससे-गांधले वस्तीवरील जिल्हा परिषद शाळा भविष्यात अडचणीत येऊ नये, गावातील मुलांना शिक्षणासाठी दुसरीकडे जावे लागू नये आणि आपल्या वस्तीवरील शाळा कायम सुरू राहावी, या सामाजिक जाणीवेतून त्यांनी हा निर्णय घेतला. शेतकऱ्यासाठी जमीन ही सर्वात मौल्यवान संपत्ती असते. अशा जमिनीतून शाळेसाठी जागा देणे म्हणजे पुढच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेले मोठे योगदान मानले जात आहे.



ससे कुटुंबीयांच्या या निर्णयामुळे गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला भक्कम आधार मिळणार असून, ग्रामस्थांकडून ससे कुटुंबियांच्या या समाजहिताच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

त्यांच्या त्या उदार उपक्रमाबद्दल वांबोरी शेतकरी संघटनेतर्फे दत्तात्रय ससे व मंगेश दत्तात्रय ससे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या या निर्णयाचा आदर्श इतरांनीही घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# कृषिदिनानिमित्त कुलगुरूंच्या हस्ते बीबीएफ यंत्राडरे सोयाबीन पेरणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या वतीने कृषिदिनानिमित्त राहुरी तालुक्यातील तांभेरे येथे 'विद्यापीठ थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' या उपक्रमाचा शुभारंभ कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बीबीएफ (ब्रॉड बेड फरो) यंत्राडरे सोयाबीन पेरणीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. खर्चे यांनी रासायनिक खतांचा संतुलित वापर, जैविक व हिरवळीच्या खतांचा अधिक वापर आणि शेतीचे यांत्रिकीकरण यामुळे शेती अधिक फायदेशीर होईल, असे सांगितले. विद्यापीठाने विकसित केलेल्या एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब शेतकऱ्यांनी करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

भाकृअप शेतकरी प्रथम प्रकल्प व ग्रामीण कृषी मौसम सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. बोडके यांनी एल निनोमुळे कमी पावसाची शक्यता लक्षात घेता बीबीएफ तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. डॉ. खरबडे यांनी विद्यापीठाने विकसित केलेल्या ३२० हून अधिक वाण व दोन हजारांपेक्षा अधिक तंत्रज्ञान शिफारशींची माहिती दिली.कार्यक्रमात प्रगतशील शेतकरी, डाळिंब उत्पादक, शेळीपालक तसेच कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. मान्यवरांनी विविध कृषी प्रकल्पांना भेट देत वृक्षारोपणही केले. कार्यक्रमाला सुमारे १५० शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी, तर आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले.

# द्रोणा अकॅडमीत 'डॉक्टर डे' उत्साहात साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :**राहाता तालुक्यातील साकुरी येशील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठान द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये डॉक्टर डे उत्साहात साजरा करण्यात आला.

द्रोणा अकॅडमी मध्ये एक जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर डे उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला .या निमित्ताने विद्यार्थ्यांना डॉक्टरांच महत्व त्यांची निस्वार्थ सेवा आणि आरोग्याबाबत जागरूक राहण्यासाठी आवश्यकता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते,संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते प्राचार्या अनिता रोहोम तसेच प्रमुख पाहुणे साईबाबा हॉस्पिटलचे डॉ. अभिमन्यू कडू व डॉ. अभिजीत कडलग यावेळी उपस्थित होते. सर्वप्रथम त्यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली.




कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे, घोषवाक्य व मनोगती सादर करण्यात आली. डॉक्टरांच्या कार्याचा गौरव करत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना निरोगी जीवनशैली स्वच्छता, नियमित व्यायाम, योगासने आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याचे महत्त्व समजावून सांगितले.

# विजेचा धक्का बसून मुलाचा मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिंगणापूर :** सोनई येथील हलवाई गल्लीत बांधलेल्या लोखंडी पाहडात विजेचा प्रवाह उतरल्याने ईश्वर उर्फ गोल्या राहुल वैरागर (वय ७, रा. अंबिकानगर ) याला विजेचा धक्का बसून मुलाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि. ३० रोजी मंगळवारी घडली. या दुर्दैवी घटनेमुळे सोनई गावात व परिसरात हळहळ व्यक्त होत असून वैरागर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

वैरागर कुटुंब अंबिकानगर येथे राहत असून हलवाई गल्लीत गेल्या काही दिवसापासून एका दुकानाचे डेकोरेटेड काम चालू असून त्यासाठी बांधण्यात आलेल्या लाकडी व लोखंडी सांगाडा मध्ये विजेचा प्रवाह आल्याने मुलाचा जागीच चिकटून मृत्यू झाला.हा प्रकार पाहता तातडीने कुटूंबीयांनी व नातेवाईकांनी उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले, मात्र वैदिकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. मृत ईश्वर हा शाळेतून घरी आला होता.एका दुकानात खाऊसाठी आला होता, तेथे दुर्दैवी घटना घडली. अशा या पावसाळ्यात धोकादायक विजवाहिनी तपासणी करून दुरुस्ती व सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहेत.

# ज्ञानेश्वर कॉलनीत सांडपाण्याचे थैमान; दूषित पाणी, घरे धोक्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील ज्ञानेश्वर कॉलनीत सांडपाण्याचा निचरा बंद झाल्याने शेकडो नागरिकांचे आरोग्य आणि मालमत्ता धोक्यात आली असून नगरपंचायत प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बसस्थानक, मळगंगा देवी परिसर, पोलीस लाईन व गंगानगर भागातील सांडपाणी तसेच पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह मुख्य रस्त्यालगतच्या नालीवरील मातीच्या भरावामुळे अडला आहे. त्यामुळे इजतेमा ग्राउंड परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचून संपूर्ण ज्ञानेश्वर कॉलनीला वेढा पडला आहे. साचलेल्या पाण्यामुळे बोअरवेलचे पाणी दूषित झाल्याचा आरोप नागरिकांनी केला असून दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि साथीच्या रोगांची भीती निर्माण झाली आहे. याच परिसरातून शहराची मुख्य पाणीपुरवठा जलवाहिनी जात असून ती फुटल्याने गटाराचे दूषित पाणी पाईपलाईनमध्ये मिसळत असल्याचा गंभीर आरोप रहिवाशांनी केला आहे. तसेच पाणी झिरपल्याने अनेक घरांच्या पायाभरणीवर परिणाम झाला असून अतिवृष्टी झाल्यास पूरस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नालीवरील मातीचा भराव तातडीने हटवून सांडपाण्याचा निचरा करावा, तसेच जलवाहिनीची दुरुस्ती करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. दरम्यान, नगरपंचायतीचे बांधकाम अभियंता सुनील गांगुर्डे यांनी दोन ते तीन दिवसांत जेसीबीच्या साहाय्याने नाली मोकळी करून नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्याची कार्यवाही हाती घेतली जाईल, असे सांगितले.

# घरकुलाच्या अनुदानासाठी २० हजारांची लाच
## सात्रळ येथील ग्रामविकास अधिकाऱ्यासह तिघे एसीबीच्या जाळ्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांच्या पुढील अनुदानासाठी हप्ता मंजूर करून देण्यासाठी वीस हजार रुपयाची लाच स्वीकारताना राहुरी तालुक्यातील सात्रळ ग्रामपंचायत येथील कंत्राटी लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ( एसीबी) रंगेहाथ पकडले. या प्रकरणात ग्राम विकास अधिकारी आणि कंत्राटी अभियंताला ही आरोपी करण्यात आले असून,तिघांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. एसीबीच्या माहितीनुसार,सात्रळ ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी हैदर याकुब पटेल (वय ५६), कंत्राटी लिपिक ज्ञानदेव मोहन डुकरे वय (वय ४३) आणि कंत्राटी अभियंता सचिन हौशीराम ब्राह्मणे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८च्या कलम ७ व १२ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तक्राराला सन २०२३ मध्ये प्रधानमंत्री



आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाले होते .पहिला हप्ता पंधरा हजार रुपयाचा आणि दुसरा ७० हजार रुपयांचा हप्ता मिळाल्यानंतर उर्वरित अनुदानाचे हप्ते मंजूर करून देण्यासाठी मदत करण्याच्या मोबदल्यात २० हजार रुपयाची लाच मागण्यात आल्याची तक्रार एसीबी कडे करण्यात आली होती. एसीबीने तक्रारीची पडताळणी केली असता ग्राम विकास अधिकारी पटेल व कंत्राटी लिपिक डुकरे यांनी लाचेची मागणी केल्याची स्पष्ट झाले. त्यानंतर मंगळवारी रचलेल्या सापळ्यात कंत्राटी लिपिक ज्ञानदेव डुकरे यांनी तक्रारदाराकडून २० हजार रुपयाची लाच स्वीकारतानाच एसीबीच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. ह्या व्यवहारासाठी कंत्राटी अभियंता सचिन ब्राह्मणे यांनी डुकरे यास प्रोत्साहन दिल्याचा आरोप एसीबीने केला आहे. पोलीस निरीक्षक सविता तांबे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली उपाधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजू आल्हाट व पथकाने सापळा यशस्वी केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक छाया देवरे करत आहेत. दरम्यान शासकीय कामासाठी लाचेची मागणी करणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध नागरिकांनी निर्भयपणे लाचलुचपतप्रतिबंधक विभागाकडे तक्रार करावी असे आव्हान एसीबीने केले.

# अन्न धान्यात महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करण्याचे कार्य स्व. वसंतराव नाईकांनी केले : प्रा.डॉ. कदम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** भारताला स्वंतत्र प्राप्त झाल्यानंतर भारतामध्ये अन्नधान्याचा प्रचंड तुडवडा निर्माण झालेला होता. त्यामुळे आपल्याला अन्नधान्य हे इतर देशांमधून आयात करावे लागत होते. पण हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला व महाराष्ट्रात तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्राने देखील अन्नधान्य उत्पादन वाढीमध्ये मोलाची भूमिका निभावली.त्यामुळे महाराष्ट्रात वसंतराव नाईक यांची हरितक्रांतीचे जनक म्हणून ओळख निर्माण झाली होती असे प्रतिपादन प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक प्रा.डॉ. उत्तमराव कदम यांनी केले आहे. लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेत आयोजित स्व. वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त म्हणजेच कृषी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. कदम बोलत होते. यावेळी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळ जाधव, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.रमेश जाधव यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ प्रवीण गायकर, प्रा.संदीप पठारे, प्रा. प्रदीप मखरे व कार्यालयीन अधीक्षक किशोर गुळवे आदींनी प्रयत्न केले.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## अहिल्याबाई होळकर शाळेत प्राचार्य स्वरूपचंद गायकवाड यांचा सेवानिवृत्ती सन्मान



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील अहिल्याबाई होळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य स्वरूपचंद गायकवाड यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी माजी मंत्री शंकरराव गडाख होते. प्रमुख उपस्थितीत माजी आमदार सुधीरभाऊ तांबे, माजी आमदार यशवंत तात्या माने, किसनराव चव्हाण, माजी आमदार पांडुरंग अभंग व हभप सुरेशानंद शास्त्री महाराज उपस्थित होते. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनानंतर माजी विद्यार्थी संघ, ग्रामपंचायत देडगाव, मुळा एज्युकेशन संस्था व विद्यालयाच्या वतीने गायकवाड यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी त्यांच्या ३५ वर्षे ६ महिन्यांच्या शैक्षणिक सेवेला उजाळा देत शिस्तप्रिय, विद्यार्थीहितदक्ष व दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाचे कौतुक केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता व विविध उपक्रमांत उल्लेखनीय प्रगती साधल्याचे वक्त्यांनी सांगितले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक, माजी विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन पत्रकार युनूस पठाण यांनी केले, तर आभार पर्यवेक्षक राशिनकर सर यांनी मानले.

## अभिषेक खंडागळे राज्यस्तरीय गुणवत्तेत झळकला; तालुक्यात यशाचा नवा विक्रम



**प्रवरानगर** : महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) २०२६ च्या निकालात लोणी येथील ज्ञानसागर क्लासेसने पुन्हा एकदा यशाची परंपरा कायम ठेवत दैदिप्यमान कामगिरी नोंदवली आहे. पीसीएम व पीसीबी गटाच्या निकालात क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत तालुक्यात मानाचे स्थान मिळविले असून परिसरात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यंदाच्या परीक्षेत ज्ञानसागर क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी अव्वल गुणवत्तेची छाप पाडली. त्यामध्ये अभिषेक खंडागळे यांनी ९९.९१ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर तेजस अंत्रे यांनी ९९.६५ टक्के गुणांसह द्वितीय आणि शुभम देशमाने यांनी ९९.४७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांकावर नाव कोरले. या निकालामुळे संस्थेच्या यशस्वी मार्गदर्शनाची आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीची पुन्हा एकदा प्रचिती आली. स्पर्धात्मक परीक्षांच्या वाढत्या वातावरणात सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन या त्रिसूत्रीच्या बळावर विद्यार्थ्यांनी हे यश मिळविल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. ज्ञानसागर क्लासेसने गेल्या काही वर्षांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षण व निकालांची सातत्यपूर्ण परंपरा निर्माण केली असून यंदाचा निकाल त्या परंपरेला अधिक बळ देणारा ठरला आहे.

## कृषी दिनानिमित्त कांगोणी येथे वृक्षारोपण व जनजागृती रॅली उत्साहात



**सोनई** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय, सोनईच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींनी ग्रामीण कृषी जागरुकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमा अंतर्गत कृषी दिनानिमित्त गावात विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना शेतकरी व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी कृषिकन्या व शेतकरी ग्रामस्थांनी खंडोबा मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालय,सोनईचे प्राचार्य डॉ. हरी मोरे , उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे , कार्यक्रम समन्वयक प्रा.अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. दिशा चव्हाण ,डॉ. संतोष चौगुले, प्रा. नरेंद्र दहातोंडे ,व इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. कृषिकन्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थ, शेतकरी तसेच शिक्षकांनी कौतुक केले.

# कोपरगावच्या सुरक्षेला नवे बळ

**अत्याधुनिक 'क्विक रिस्पॉन्स फायर अँड रेस्क्यू' वाहन ताफ्यात । आग, अपघात आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी नगरपरिषद सज्ज**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : शहरातील अग्निशमन व आपत्कालीन बचाव यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत महाराष्ट्र शासनाच्या वतीने कोपरगाव नगरपरिषदेच्या ताफ्यात अत्याधुनिक क्विक रिस्पॉन्स फायर अँड रेस्क्यू वाहन दाखल झाले आहे. नगरपरिषद परिसरात विधिवत पूजन करून मान्यवरांच्या उपस्थितीत या वाहनाचे लोकार्पण करण्यात आले. आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नगराध्यक्ष पराग संधान यांच्या नेतृत्वात नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आग, रस्ते अपघात, नैसर्गिक आपत्ती तसेच इतर आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत व प्रभावी बचावकार्य करण्यासाठी हे वाहन उपयुक्त ठरणार आहे.

या वाहनात ३०० लिटर पाण्याची आणि ५० लिटर फोमची क्षमता असून विविध बचाव मोहिमांसाठी आवश्यक अत्याधुनिक उपकरणांचा समावेश करण्यात आला आहे. फर्स्ट एड बॉक्स, इमर्जन्सी सर्च लाईट, न्यूमॅटिक लिफ्टिंग बॅग, हायड्रॉलिक जॅक, बॅटरीवर चालणारे वुड कटर, चेन बोल्ट कटर, रेस्क्यू हार्नेस, मल्टीपर्पज टूल किट, क्रोबार, रॅमर, नायलॉन रोप आदी साहित्यामुळे अपघातग्रस्त वाहनांमध्ये अडकलेल्या व्यक्तींची सुटका, अरुंद रस्त्यांवरील आग विझविणे तसेच वादळी वाऱ्यामुळे पडलेली झाडे हटविणे अधिक वेगाने शक्य होणार आहे.

नगराध्यक्ष पराग संधान म्हणाले, की केमिकल किंवा इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे लागणाऱ्या आगींवर नियंत्रणासाठी या वाहनात फोमची सुविधाही उपलब्ध आहे. शहरातील अरुंद रस्ते व झोपडपट्टी भागात मोठी अग्निशमन वाहने पोहोचणे कठीण असते. अशा ठिकाणी हे वाहन तातडीने पोहोचून प्रभावी बचावकार्य करेल.

त्यामुळे शहरातील आपत्कालीन सेवा अधिक सक्षम होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्याधिकारी अजित निकत, आरोग्य सभापती वैभव आढाव, नगरसेवक, पदाधिकारी, नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वाहनामुळे कोपरगाव शहरातील आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अधिक आधुनिक, गतिमान आणि परिणामकारक होणार असून नागरिकांच्या सुरक्षिततेला मोठे बळ मिळणार आहे.

## कोपरगाव व पारनेरमध्ये अवैध वाळू वाहतुकीवर छापे

**एलसीबीकडून ३५.६० लाखांचा मुद्देमाल जप्त**



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : स्थानिक गुन्हे शाखेने कोपरगाव शहर व पारनेर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध वाळू वाहतुकीविरोधात धडक कारवाई करत दोन गुन्हे दाखल केले असून, ३५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत चार आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार आणि पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि संदीप दरवडे व दिपक मेढे यांच्या पथकाने ३० जून रोजी ही कारवाई केली. कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चार ब्रास अवैध वाळूसह सुमारे २७.४० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आकाश संजय रोकडे, अजय महादेव जाधव (दोघे रा. इंदिरानगर, कोपरगाव) आणि रवि सुनिल सोनवणे (रा. येसगाव, ता. कोपरगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तर पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन ब्रास वाळूसह ८.२० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दत्तात्रय नाना मेंगाळ (रा. खडकवाडी, ता. पारनेर) याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच गौण खनिज कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून, जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधातील कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेने स्पष्ट केले आहे.

## संगमनेरच्या 'महर्षी सांदिपनी गुरुकुल'चा डंका!

**'मृदंग विशारद' परिक्षेत तीन विद्यार्थी उत्तीर्ण**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री






**साकूर** : संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी येथील ज्ञानराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित,'महर्षी सांदिपनी गुरुकुल'च्या विद्यार्थ्यांनी आपल्या दैदिप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहेत. अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई अंतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या अत्यंत कठीण अशा 'मृदंग विशारद' परिक्षेत गुरुकुलच्या तीन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या जोरावर यंदाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन या विद्यार्थ्यांनी 'मृदंग विशारद' ही मानाची पदवी प्राप्त केली. यात प्रतीक राजेंद्र भराडे,आकाश बाळासाहेब लेंभे, निखिल जनार्दन मेघळे,या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कलागुणांच्या आणि शास्त्रोक्त वादनाच्या जोरावर हे यश मिळवले असून, त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.गुरुकुलचे संस्थापक आणि मार्गदर्शक, गुरूवर्य मृदंग महर्षी ह.भ.प. राम महाराज पवळ (गुरूजी) यांच्या अथक परिश्रमातून आणि अचूक मार्गदर्शनामुळेच हे यश मिळाल्याची कृतज्ञ भावना उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. राम महाराज पवळ गुरुजींच्या शिस्तीत, संस्कारात आणि देखरेखीखाली येथे अनेक विद्यार्थी मृदंगाचे शास्त्रोक्त शिक्षण घेत आहेत.महर्षी सांदिपनी गुरुकुलने ग्रामीण आणि शहरी भागातील शेकडो विद्यार्थ्यांना मृदंग वादनाचा वारसा दिला आहे.

आजपर्यंत या गुरुकुलमधून तब्बल ४० हून अधिक विद्यार्थ्यांनी 'मृदंग विशारद' ही मानाची पदवी मिळवली आहे, जो संगीत क्षेत्रात एक मोठा विक्रम मानला जातो.या घवघवीत यशाबद्दल उत्तीर्ण झालेल्या तिन्ही विद्यार्थ्यांचे गुरूवर्य राम महाराज पवळ (गुरूजी), भजनी मंडळ, वारकरी संप्रदाय, नागरिक आणि पालकांकडून मनःपूर्वक अभिनंदन केले जात आहे. संगमनेर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून या गुणवंत विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील सांगीतिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## पी.एम. श्री. जि.प. शाळेची गुणवत्ता ढासळली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**गोंडेगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील जिल्ह्यातील सर्वात मोठी शाळा म्हणून नावलौकिक असलेल्या गोंडेगाव येथील पी.एम. श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शैक्षणिक गुणवत्ता कमालीची ढासळली आहे. परिणामी, संतप्त पालकांनी आपल्या पाल्यांच्या चांगल्या भविष्यासाठी खाजगी शाळांचा रस्ता धरल्याचे चित्र समोर आले आहे. या गंभीर परिस्थितीबाबत शाळेतील शिक्षक व प्रशासनाकडे विचारणा केली असता, व्यवस्थापकांनी संबंधित प्रश्नांवर बोलण्यास साफ टाळाटाळ केली. त्यामुळे या प्रकरणात शिक्षण विभागाने त्वरित लक्ष घालून योग्य तो खुलासा करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र थोरात यांनी दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोंडेगावची ही जिल्हा परिषद शाळा कधीकाळी जिल्ह्यातील एक नामांकित शाळा म्हणून गणली जात होती. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या चालू वर्षात इयत्ता पहिलीसाठी केवळ ३२ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला आहे. पटसंख्या एवढ्या मोठ्या प्रमाणावर घटल्यामुळे आता पहिलीची एक तुकडी थेट बंद करण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. ही घसरण शाळेच्या ढासळत्या शैक्षणिक स्तराचा जिवंत पुरावा मानली जात आहे. शासकीय निधीचा गैरवापर आणि प्रशासकीय अनास्थेमुळे एका मोठ्या आणि दर्जेदार शाळेची अशी दुरवस्था झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

या गंभीर विषयावर आता शिक्षण विभाग काय कारवाई करणार आणि या दुरवस्थेला कारणीभूत असणाऱ्यांवर काय पावले उचलणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. योग्य खुलासा न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## शेतकरी कृषी कार्यशाळा घेऊन नेवासा पंचायत समितीत कृषी दिन साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : कै.वसंतराव नाईक यांची जयंतीच्या निमित्ताने शेतकरी कृषी कार्यशाळा घेऊन नेवासा पंचायत समितीमध्ये कृषी दिन साजरा करण्यात आला. पंचायत समिती नेवासा व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नेवासा पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या कृषी दिन व शेतकरी कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.विजयाताई अंबाडे हया होत्या. तर कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोकराव ढगे,तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे,नेवासा पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी बाळासाहेब कासार, उद्धव शिंदे, रखमाजी लांडे, शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, कृषीभूषण मोहन तुवर, भाजपच्या नेत्या भारती बेद्रे,फार्मर कंपनीचे उद्योजक सुनील पवार, जांभुळ प्रक्रिया निर्माण करणारे शेतकरी बाबासाहेब कंक,शेतकरी पुंजाराम महाराज पेचे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी झालेल्या कार्यशाळेच्या कार्यक्रम प्रसंगी हरित क्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.कार्य शाळेच्या शुभारंभ प्रसंगी नेवासा पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी बाळासाहेब कासार यांनी आलेल्या मान्यवर अतिथींचे स्वागत केले. यावेळी कृषी भूषण मोहन तुवर, कृषी सखी कावेरी पठाडे, कल्पना घोरपडे, वैशाली शिंदे, मनिषा तनपुरे,जयश्री घोगरे, सुनीता पाचे, पशु सखी श्रध्दा आरगडे, शेतकरी पुंजाराम महाराज पेचे, धनंजय कंक यांचा सत्काराद्वारे सन्मान करण्यात आला.

कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे यांनी शेतकऱ्यांनी पिकवलेल्या भाजीपाल्याचे भाव ठरविण्याची यंत्रणा देशात नाही, त्यामुळे शेतकऱ्यांची शोषणाची सिस्टीम चुकीची असून यात बदल करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र व्यवहार केला असून शेतकऱ्यांनी कमी पाण्याची पिके घेण्याचे आवाहन केले.

## संगमनेरमध्ये कत्तलखान्यावर एलसीबीचा छापा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने संगमनेर शहरात अवैध गोवंशीय कत्तल व गोमांस वाहतूक करणाऱ्या टोळीवर पहाटे छापा टाकून सुमारे २ हजार किलो गोमांस आणि महिंद्रा बोलेरो पिकअप असा एकूण १२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच दोन्ही संशयित अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाले. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार व पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महादेव गुट्टे यांच्या पथकाने ही कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे सुकेवाडी रोडवरील श्रमिकनगर परिसरात, जिजामाता इंग्लिश स्कूलजवळ छापा टाकण्यात आला. तेथे उभी असलेल्या पिकअप वाहनातून गोमांस विक्रीसाठी वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. तपासात फरार संशयितांची नावे रेहान उर्फ जादू गुलाबनबी कुरेशी (रा. अलकानगर, संगमनेर) आणि काशीब असद कुरेशी (रा. भारतनगर, संगमनेर) अशी निष्पन्न झाली. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे. पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहेत.

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी रेहकुरी ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम तबाजी किसन गायकवाड रा. रेहकुरी ता कर्जत जि. अहिल्यानगर यांनी आई नामे श्री/श्रीम कै वंचाबाई किसन गायकवाड या नावे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू ता. रेहकुरी ता. कर्जत जि.अहिल्यानगर या ठीकाणी दि ०४/०४/१९९९ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि १७/०२/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**रवि सतवन**
**तहसिलदार कर्जत**

### सायटेशन नोटीस

**भुषण मनोजकुमार वैराळ**
**ॲडहोकेट**
**नि.नं. ६**
**ने ता. ०४/०८/२०२६**

श्रीरामपूर येथील मे. सिव्हील जज्ज साहेब (ज्यु.डी.)...यांचे कोर्टात
वा.चौ. अर्ज नं. ४५/२००५

१. सोन्याबापु मुरलीधर शिंदे, वय ३९ वर्षे, धंदा - शेती, रा. सम्राट नगर, सुतगिरणी रोड श्रीरामपूर ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर. मो नं ९६२३०८५८१३

२. मंगल सुरेश काळे, वय ४२ वर्षे धंदा घरकाम, रा. वॉर्ड नं १, भगतसिंग चौक शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर....अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही.....सा. वाला

अर्ज : इंडियन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ अन्वये वारस सर्टिफिकेट मिळणेसाठी

अर्जदार नं १ व २ हे बहिण भाऊ आहेत त्यांचे वडिल नामे मुरलीधर गणपत शिंदे हे दिनांक १४/०८/२०२१ रोजी श्रीरामपूर येथे राहते घरी मयत झाले. त्यांचा अंत्यविधी श्रीरामपूर शहर स्मशानभुमि येथेच करण्यात आला होता. तसेच अर्जदारांची आई नामे मुक्ताबाई हया देखिल दिनांक १९/१०/२०१९ रोजी श्रीरामपूर येथेच मयत झालेल्या आहेत. मयत मुरलीधर गणपत शिंदे यांना अर्जदारांव्यतिरिक्त कोणीही वारस नाहीत.

मयत मुरलीधर गणपत शिंदे यांचे नावे मौजे भैरवनाथ नगर ता श्रीरामपूर येथे गट नं ४२/१४ ही मिळकत होती. वडिलांचे मृत्युनंतर वारस म्हणून मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटला अर्जदारांचे नावाची नोंद झालेली आहे. मयत मुरलीधर गणपत शिंदे हे मयत होण्यापुर्वी त्यांनी भैरवनाथ नगर ग्रामपंचायत कार्यालय येथे घरकुल उपाययोजनेचा लाभ मिळणेसाठी अर्ज केलेला होता. परंतु दुर्दैवाने मुरलीधर शिंदे मयत झाल्यानंतर अर्जदाराने ग्रामपंचायत कार्यालय भैरवनाथ नगर यांचेकडे घरकुल उपाययोजनेचा पुढील लाभ मिळणेकरीता विचारणा केली असता संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांनी अर्जदाराला मयत मुरलीधर गणपत शिंदे यांचे कायदेशिर वारस असले बाबत वारस प्रमाणपत्र मे न्यायालयातुन प्राप्त करावे असे सुचित केले त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

त्या अर्थी सदरहु अर्जदारांचे अर्जाबाबत कोणालाही काही हरकत असल्यास सदरहू न्यायालयातही नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्यात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात जर सदरहु मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांचा लागलीच पुरावा घेऊन अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येऊन अर्जदारांच्या मुलाचे वारस प्रमाण पत्र देण्यात येईल

आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझ्या राहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्या निशी दिली जाते.

**कामगिरी क्लार्क**
**३ रे दिवाणी न्यायालय**
**श्रीरामपूर क स्तर**

शिक्का

**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय श्रीरामपूर**
**क स्तर**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/१६५/२०२६
नेवासा दिनांक. १७/०६/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-रोहिदास शिवदास सोनवणे रा. टाकळी, बु, ता.पाचोरा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. साई रोहिदास सोनवणे रा. टाकळी, बु, ता.पाचोरा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिले दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-साई रोहिदास सोनवणे, गावाचे नाव-सानई, जन्म दिनांक-०७/०४/२०२५

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/१३९/२०२६
नेवासा दिनांक. १२/०६/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-भाऊसाहेब संतराम गायकवाड रा. गिडेगांव, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. आरती रावसाहेब गायकवाड रा. गिडेगांव यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिले दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-आरती रावसाहेब गायकवाड, गावाचे नाव-गिडेगांव, जन्म दिनांक-०७/०१/२००४

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# विधानसभेत आमदार अमोल खताळ यांचा संगमनेरच्या प्रश्नांवर घणाघात

**नगरपालिकेतील कथित भ्रष्टाचारासह विविध विकासकामांसाठी निधीची मागणी**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : शहर व तालुक्यातील पाणीपुरवठा, रस्ते, नगरपालिकेतील कथित भ्रष्टाचार, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, कत्तलखाना, कुंभमेळा तयारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रलंबित कामांबाबत आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत पुरवणी मागण्यांवरील चर्चे दरम्यान शासनाचे लक्ष वेधले.

संगमनेरच्या विकासासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत मंजूर झालेली वाढीव पाणीपुरवठा योजना अनेक वर्षांपासून अपूर्ण असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करून वाढत्या लोकसंख्येचा विचार करत योजना सुधारित स्वरूपात राबविण्यासाठी अतिरिक्त ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची मागणी त्यांनी केली. नगरपालिकेच्या शाळांची दुरवस्था, भुयारी गटार योजनेतील कथित भ्रष्टाचार, नाल्यांवरील अतिक्रमणे, शहराचा सुधारित विकास आराखडा आणि हद्दवाढ या विषयांकडेही त्यांनी सरकारचे लक्ष वेधले.

संगमनेर नगरपालिकेकडे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प नसल्याने दूषित पाणी प्रवरा व म्हाळुंगी नदीत सोडले जात असून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे सांगत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई आणि कथित भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. शहरातील कत्तलखाना शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून शहराच्या हद्दीत व नदीकाठी सुरू करण्यात आल्याचा आरोप करत तो कायमस्वरूपी बंद करण्याची मागणीही त्यांनी केली. नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर संगमनेरमध्ये भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने नागरी सुविधा उभारण्यासाठी विशेष निधी देण्याची आवश्यकता त्यांनी मांडली.

तालुक्यातील प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरण, संगमनेर-कोपरगाव रस्त्याची तातडीने दुरुस्ती, सार्वजनिक बांधकाम विभागाचे नवीन कार्यालय, शासकीय निवासस्थाने, व्हीआयपी विश्रामगृहाचे नूतनीकरण आणि भूमी अभिलेख कार्यालयाच्या विस्तारीकरणासाठी निधी देण्याची मागणीही त्यांनी केली. कोल्हार-घोटी मार्गावरील खराब झालेल्या रस्त्याबाबत संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करून आवश्यक असल्यास नव्याने निविदा काढून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी करत संगमनेरच्या सर्वांगीण विकासासाठी मांडलेल्या सर्व मागण्या शासनाने त्वरित मंजूर कराव्यात, अशी अपेक्षा आमदार खताळ यांनी व्यक्त केली.

## पान १ वरुन

### लोकवस्तीतच जुगार अड्ड्यांचे जाळे?

येण्यास धजावत नसल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे अधिकृत तक्रारी कमी असल्या तरी लोकांमधील नाराजी आणि चिंता मोठ्या प्रमाणात असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी पोलिसांकडून विविध कारवाया सुरू असताना, निवासी भागांतील कथित जुगार अड्ड्यांवरही स्वतंत्र, नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण मोहीम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. संशयित ठिकाणांची पडताळणी, स्थानिक माहितीचे संकलन, तक्रारदारांच्या गोपनीयतेचे संरक्षण आणि डोळ्यात भरेल अशी कारवाई यावर भर दिल्यास अशा प्रकारांना आळा बसू शकतो, असे नागरिकांचे मत आहे. नागरिकांची अपेक्षा आहे की, रहिवासी परिसर सुरक्षित राहावेत, कायद्याचा धाक कायम राहावा आणि अवैध धंद्यांमुळे सर्वसामान्यांच्या जीवनावर परिणाम होऊ नये.

### तांभेरेत पुन्हा मृतदेह आढळला!

शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी परिसरातील नागरिकांकडे चौकशी सुरू केली आहे. परिसरातील तसेच जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या हरवलेल्या व्यक्तींच्या नोंदीही तपासल्या जात आहेत.याप्रकरणी राहुरी पोलिसांनी विविध बाजूंनी तपासाची चक्रे फिरवली असून, लवकरच या घटनेचा उलगडा होण्याची शक्यता आहे.मात्र परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

### वृद्धेश्वर येथे छापा ......

आलेल्या कारवाईत राम एकनाथ पुरी (वय ५५, रा. श्री क्षेत्र वृद्धेश्वर, ता. पाथर्डी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांना वृद्धेश्वर येथे गांजाची मोठी खेप साठवून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशान्वये, गुन्हे शाखा व पाथर्डी पोलिसांच्या संयुक्त पथकाने वृद्धेश्वर येथील शेतगट क्रमांक ३६१ मधील राम पुरी याच्या घरावर छापा टाकला. दोन सरकारी पंच तालुक्यातील अधिकारी व पोलिस यांनी पंचांसमक्ष घराची झाडाझडती घेतली असता, घराच्या एका कोपऱ्यात गोणीत विक्रीसाठी लपवून ठेवलेला २० किलो १० ग्रॅम तयार गांजा आढळून आला. बाजारात प्रतिकिलो २५ हजार रुपये दराने या गांजाची एकूण किंमत ५ लाख २५० रुपये आहे. पोलिसांनी सर्व मुद्देमाल जप्त करून आरोपीला बेड्या ठोकल्या. तालुक्यातील मुख्य तस्कर पकडण्यासोबतच पाथर्डी पोलिसांनी शहरातील विविध भागातील गांजा सेवनाविरोधात मोठी मोहीम राबवली. सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढणाऱ्या तिघांना पोलिसांनी रंगेहाथ पकडून त्यांच्यावर तीन स्वतंत्र गुन्हे दाखल केले.

# श्री संत नरहरी महाराज पालखी सोहळ्याची परंपरा २८ वर्षानंतरही त्याच उत्साहात सुरू



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी : राजेंद्र परदेशी** शहरातील श्री संत नरहरी महाराज पालखी सोहळ्याची परंपरा २८ वर्षानंतरही त्याच उत्साहात व त्याच जल्लोषात आजही सुरू आहे.

राहुरी शहरातील प्रसिद्ध सराफ व्यावसायिक नरहरी मारुती उदावंत यांनी दिनांक नऊ जुलै १९९८ रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे जाण्यासाठी श्री संत नरहरी महाराज यांच्या पालखी सोहळ्याला श्रीक्षेत्र नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरापासून सुरुवात केली होती त्यावेळी त्या पालखी सोहळ्याचे संस्थापक वाडेगव्हाण येथील शंकरराव कुलथे व अहिल्यानगर येथील भास्करराव मुंडलिक हे होते.

श्री संत नरहरी महाराज पालखी सोहळ्याला प्रामुख्याने राहुरीतील प्रसिद्ध सराफ व्यावसायिक नरहरी उदावंत यांच्यासह गोटीराम नागरे, गोरक्षनाथ मिसाळ, अनिल शहाणे, कृष्णराव नागरे, शिरीष बुऱ्हाडे यांनी विशेष पुढाकार घेतला होता.

श्रीक्षेत्र नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातुन या पालखी सोहळ्याला सुरुवात झाली त्यावेळी सर्वांच्या उपस्थितीत श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन घेऊन विणा पूजन करण्यात आले. आणि त्यानंतर श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आषाढी एकादशीच्या पर्वणीसाठी श्री संत नरहरी महाराज पालखी रवाना झाली. या सोहळ्यातील अनेक भाविक आज हयात नाहीत परंतु सुरू झालेली ही पालखी २८ वर्षानंतरही मोठ्या डामडौलाने सुरू आहे उलट पालखीमध्ये जाणाऱ्या भाविकांची व वारकऱ्यांची संख्या त्या प्रमाणात वाढली असून २८ वर्षांपूर्वीच्या आठवणी आजही डोळ्यासमोर तरंगताना दिसत आहेत. श्री संत शिरोमणी महाराज पालखी सोहळा दक्षता ट्रस्टचे गोरक्षनाथ मिसाळ नरहरी उदावंत, अनिल शहाणे, गोटीराम नागरे, कृष्णराव नागरे, सुधाकरराव मिसाळ, मनोहर शहाणे, अरुण चिंतामणी, अरुण मंजरतकर, बाळासाहेब लोळगे, नारायणराव डहाळे, ज्ञानदेव बेंद्रे, कृष्णराव डहाळे, पोपटराव कुलथे, भास्करराव मंडलिक, शंकरराव कुलथे, काशिनाथ नागरे ही सर्व मंडळी व महिला भगिनी त्यावेळी उपस्थित होत्या.

# सावखेडगंगा जि प शाळेला आमदार निधीतून कॉम्प्युटर भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर:** तालुक्यातील सावखेडगंगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची कपाटे खुली झाली आहेत. पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांच्या आमदार निधीतून या शाळेसाठी कॉम्प्युटर (संगणक) देण्यात आले आहेत. या सुविधेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आता संगणकीय ज्ञानाचे धडे गिरवता येणार असल्याने गावात आनंदाचे वातावरण आहे.शाळेला संगणक मिळाल्याबद्दल विद्यार्थी, शिक्षक वृंद आणि पालक वर्गाच्या वतीने आमदार सतीश चव्हाण यांचे विशेष आभार मानण्यात आले.पंकज ठोंबरे यांच्या प्रयत्नांना यश सावखेडगंगा जिल्हा परिषद शाळेत आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे यांनी सातत्याने विशेष प्रयत्न केले होते. त्यांच्या या पाठपुराव्यामुळेच शाळेला हा आमदार निधी मिळाला. या महत्त्वपूर्ण कामगिरीबद्दल ग्रामस्थांनी आणि शाळा प्रशासनाने पंकज ठोंबरे यांचेही जाहीर आभार व्यक्त केले आहेत.या संगणक सुविधेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या युगात मागे पडणार नाहीत, असा विश्वास यावेळी शिक्षकांनी व्यक्त केला.



# १८ वर्षांपासून चर्चेत असलेल्या बनावट प्रमाणपत्र प्रकरणातील सर्व आरोपी निर्दोष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर :** वैजापूरमध्ये गेल्या सुमारे १८ वर्षांपासून चर्चेत असलेल्या कथित बनावट प्रमाणपत्र व जमीन खरेदी-विक्री प्रकरणात न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत सर्व पाच आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाचे न्यायाधीश ए. डी. पाटील यांनी हा निकाल देताना अभियोजन पक्ष आरोप सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे नमूद केले.

हे प्रकरण २००८ मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्याशी संबंधित होते. तक्रारदार अविनाश निकम यांनी नांदूर-मधमेश्वर कालवा लाभक्षेत्रासंदर्भातील कथित बनावट प्रमाणपत्र तयार करून त्याचा जमीन व्यवहारात वापर करण्यात आल्याचा आरोप केला होता. यामुळे शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचा तसेच शेतकरी आणि जमीन खरेदीदारांची दिशाभूल झाल्याचा दावा करण्यात आला होता.

या प्रकरणात बॉण्ड रायटर सुभाष शरचंद बोहरा, सुखदेव किसन जाधव, अब्दुल अलीम अब्दुल गफूर शेख, राजेंद्र गोविंदराव लालसरे आणि वजीर युसुफ सय्यद यांच्याविरुद्ध फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे व त्यांचा वापर करणे अशा विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सुनावणीदरम्यान बचाव पक्षाचे अॅड. राजेंद्र हरिदास आणि अॅड. निखिल हरिदास यांनी प्रभावी युक्तिवाद केला. कथित बनावट प्रमाणपत्र सिद्ध करण्यासाठी कोणताही वैज्ञानिक किंवा तांत्रिक पुरावा सादर करण्यात आलेला नाही, असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. हस्ताक्षर तज्ज्ञांचा अहवाल, फॉरेन्सिक तपासणी अहवाल किंवा संबंधित अधिकाऱ्यांची साक्षही सादर करण्यात आलेली नव्हती.

न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले की, केवळ संशयाच्या आधारावर कोणालाही दोषी ठरविता येत नाही. आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोजन पक्षावर असते आणि ती संदेहाच्या पलीकडे सिद्ध होणे आवश्यक आहे. मात्र उपलब्ध पुरावे व साक्षीदारांच्या आधारे आरोपींचा गुन्ह्यातील सहभाग सिद्ध होऊ शकला नाही.

# शिक्षणाचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी करा : डॉ. गोवर्धन हुसळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**शिर्डी :** शिक्षणाचा उपयोग केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असे प्रतिपादन महाविद्यालय विकास समितीचे माजी सदस्य डॉ. गोवर्धन हुसळे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागिरी महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव येथे आरोग्य समिती व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय डॉक्टर दिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन अॅड. संदीप वर्पे होते.

डॉ. हुसळे म्हणाले, ''जगात कितीही मोठे यश मिळाले तरी माणसाने आपल्या मूळाशी नाते जपले पाहिजे. झाडाचे अस्तित्व जसे मुळांवर अवलंबून असते, तसेच माझ्या आयुष्याची ायाभरणी एस.एस. जी.एम. महाविद्यालयात झालेल्या संस्कारांमुळे झाली. विज्ञान ज्ञान देते, परंतु मूल्ये त्या ज्ञानाला योग्य दिशा देतात.'' महाविद्यालयात मिळालेली शिस्त, स्वावलंबन, समाजसेवा आणि चिकित्सक विचारसरणी यामुळेच वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी वाटचाल करता आली, असे त्यांनी सांगितले. निरोगी जीवनासाठी योग्य आहार, विहार आणि नियमित व्यायामाचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.कार्यक्रमास महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. सतीश अजमेरे, डॉ. अमोल अजमेरे, डॉ. रामदास आव्हाड, डॉ. निलेश गायकवाड, डॉ. शीतल आव्हाड यांच्यासह अनेक डॉक्टर, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. रवींद्र हिंगे यांनी केले, तर आभार आरोग्य सेवा समितीच्या प्रमुख डॉ. प्रतिभा रांधवणे यांनी मानले.आवश्यक असल्यास ही बातमी आणखी आकर्षक पान-१ शैलीत किंवा २०० शब्दांतही तयार करून देऊ शकतो.

# अवैध जुगार व्यवसाय विरोधात कारवाई,

## एकाला अटक



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर :** शहरात अवैध जुगार व्यवसायाविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत पोलिसांनी बुधवारी सायंकाळी मोठी कारवाई करत चक्री जुगार खेळवणाऱ्या एका युवकाला रंगेहाथ अटक केली. या कारवाईत रोख रक्कम, एलईडी टीव्ही, मोबाईल फोन आणि जुगार साहित्य असा एकूण ३६ हजार १२३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैजापूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी अवैध धंद्यांची माहिती गोळा करण्यासाठी गस्त घालत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, शहरातील बोथरा पेट्रोल पंपाजवळील एका टपरीत चक्री जुगार सुरू आहे. या माहितीची खात्री करून पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी छापा टाकला.

छापेमारीदरम्यान एका व्यक्तीला नागरिकांकडून पैसे घेऊन चक्री जुगार खेळविताना पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत त्याची ओळख शुभम रावसाहेब जाधव (वय ३०, रा. इंगळे गल्ली, वैजापूर) अशी पटली. पोलिसांनी त्याच्याकडून १ हजार १२३ रुपये रोख, २० हजार रुपये किमतीचा एमआय कंपनीचा एलईडी टीव्ही, १५ हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा स्मार्ट मोबाईल फोन तसेच चक्री जुगारासाठी वापरण्यात येणारा फलक व इतर साहित्य जप्त केले.

पोलिस तपासात हा चक्री जुगार कोणाच्या सांगण्यावरून चालविला जात असल्याची माहिती अद्याप समजू शकले नसून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या प्रकरणी शुभम जाधव याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेला मुद्देमाल पंचनामा करून ताब्यात घेण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. शहरातील जुगार, सट्टा व इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधातील कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# पाऊस उशिराने सुरु होऊनही कपाशी लागवडीच्या लगबगीत विक्रमी वाढ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**माळवाडगांव :** मृग नक्षत्राचा पाऊस वेळेवर पडला तर कपाशी क्षेत्रात वाढ होत असे. यावर्षी संपूर्ण मृग नक्षत्र कोरडे जाऊन तब्बल २१ दिवसाने आद्रा नक्षत्रात पावसाळा उशीराने सुरू होऊनही , श्रीरामपूरच्या पूर्व गोदाकाठ परिसरात सर्वत्र कपाशी लागवडीची लगबग सुरू असल्याने, कपाशी लागवड क्षेत्रात विक्रमी वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

गोदाकाठ परिसरातील जमिनीचा पोत जाड चिवट असल्याने कपाशी पिकांना शेतकरी अधिक प्राधान्य देतात. जूनच्या शेवटच्या आठवड्यात आद्रा नक्षत्राचा जोरदार अन् समाधानकारक खरिप पेरणी लायक पाऊस पडला.कपाशी लागवडीची सरीसह पूर्व मशागत शेतकरी पावसापूर्वी पूर्ण करतात. त्यामुळे पावसाने थोडीफार उघडीप देताच चार दिवसांपासून सर्वत्र कपाशी लागवड लगबग वेगाने सुरू असल्याचे चित्र सर्व शिवारात दिसून येत आहे.कापूस लागवडीस मजुर रोजंदारीवर न येता ४७५ ग्रॅमचे बियाणे बॅंग ५०० ते ६०० रूपये प्रमाणे मजुरी घेतात. महिला मजुरांना बॅंगवर कपाशी बियाणे लावण्यास परवडत असल्याने. कपाशी लागवडी सर्वत्र वेगाने सुरू आहेत. सोयाबीन मका लागवडीस अद्याप वापसा नसल्याने अन् दररोज अधुनमधून झीम झीम पावसाच्या सरी मागुन सरी येत असल्याने शेतात ओलावा टिकून आहे.त्यामुळे खरिपातील सोयाबीन मका पेरणीस ऊशीर होत आहे. रिम झीम पावसातही कापूस लागवड सुरू असल्याने अंतिम टप्प्यात असून, चार दिवसांत कपाशी लागवड आटोपल्यावर शेतकरी जमिनीतील ओलावा कमी झाल्यावर सोयाबीन मका लागवडीकडे वळतील.



## निधन वार्ता

### सृष्टीपाल धुस्सा



**श्रीरामपूर, :** येथील रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष तत्कालीन श्रीराम सॉ मीलचे मालक सृष्टीपाल जगन्नाथ धुस्सा (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते साईचरण शु पॅलेस छत्रपती शिवाजी रोडचे मालक राजेश व अनुप धुस्सा यांचे वडील व संजय, नरेंद्र, अनिल, निलेश, राकेश धुस्सा यांचे चुलते तसेच यश, हर्षित धुस्सा यांचे ते आजोबा होत. सृष्टीपाल धुस्सा यांचे अंतिम इच्छेनुसार त्यांचे नेत्रदान करण्यात आले.

# जनतेच्या निस्सीम प्रेमातून घडलेलं नेतृत्व: आमदार विठ्ठलराव लंघे पाटील

नेवासा तालुक्याच्या राजकारणात स्वतःला झिजवणारे, जमिनीशी नातं सांगणारे आणि पायाला चिखल लागेपर्यंत जनतेच्या सुख-दुःखात मिसळणारे नेतृत्व म्हणजे कार्यधुरंधर आमदार विठ्ठलराव लंघे पाटील. ३० वर्षांचा प्रदीर्घ, संघर्षमय आणि तितकाच जिद्दीचा प्रवास पाठीशी असणाऱ्या या लोकनेत्याच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या राजकीय प्रवासाचा घेतलेला हा वेध...

विठ्ठलराव यांना स्वर्गीय आमदार वकीलअण्णा लंघे पाटलांकडून साम्यवादाचे संस्कार मिळाले. मात्र, तरुण वयात अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांच्या राष्ट्रवादाने त्यांचे मन जिंकले. ज्या काळात नेवासा तालुक्यात भाजपचा झेंडा हाती घेणाऱ्याला वेड्यात काढले जायचे, थट्टा केली जायची, अशा कठीण काळात विठ्ठलरावांनी तालुक्यात भाजपची बीजे रोवली. लोकांच्या हसण्याकडे दुर्लक्ष करत त्यांनी आपला संघर्ष सुरूच ठेवला.

२००४ च्या निवडणुकीत नेवासा तालुक्यातील गरीब जनतेने, कामगारांनी स्वतःचे पैसे (नोट) आणि मत (वोट) देऊन विठ्ठलरावांना डोक्यावर घेतले होते. मतमोजणीच्या दिवशी गुलालाची उधळणही झाली, पण अचानक ''विठ्ठलराव हरले'' अशी बातमी आली. तो पराभव नव्हता, तर त्यांना 'हरवले' गेले होते. समर्थकांच्या डोळ्यात अश्रू होते, पण विठ्ठलरावांनी हार न मानता पुन्हा जनसेवेच्या मैदानात उतरण्याचा निर्धार केला.

२००९ च्या निवडणुकीत तर इतिहास घडला. गरीब शेतकरी, बलुतेदार आणि कार्यकर्त्यांनी घरची भाकरी उपरण्यात बांधून विठ्ठलरावांचा प्रचार केला. विठ्ठलरावांनी स्वतःची जमीन विकून ही निवडणूक लढवली. निकालानंतर पुन्हा पराभव वाट्याला आला, पण जनतेच्या डोळ्यात एकच इच्छा होती – ''एकदा तरी हा फाटक्या जनतेचा विठ्ठल आमदार व्हावा!''

२०१४ मध्ये विठ्ठलरावांकडे भाजपमध्ये परत जाऊन उमेदवारी घेण्याची मोठी संधी होती. परंतु, स्वार्थासाठी कोलांटउडी मारणे माझ्या संस्कारात नाही, असे म्हणत त्यांनी नैतिकतेला प्राधान्य दिले. त्यांनी ज्या मातीत आयुष्यभर मेहनत घेतली, तिथे दुसऱ्याने आमदारकीचे रोपटे लावले. तो काळ त्यांच्यासाठी भावनिकदृष्ट्या कठीण होता, पण त्यांनी जनसेवेचा मार्ग सोडला नाही. पुढे त्यांनी अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि सदस्य म्हणून काम करताना कधीही पदाचा अहंकार ठेवला नाही. शेवटच्या माणसाला रस्ते, वीज आणि पाणी मिळवून देण्यासाठी ते सतत लढत राहिले.

अखेर २०२४ मध्ये विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या ३० वर्षांच्या संघर्षाचे सोने झाले. शिवसेना (शिंदे गट) कडून त्यांना उमेदवारी मिळाली आणि नेवासा मतदारसंघातील जनतेने त्यांना प्रचंड बहुमताने विजयी केले. हा विजय केवळ एका निवडणुकीचा नव्हता, तर तो जनतेच्या निष्ठेचा आणि विठ्ठलरावांच्या ३० वर्षांच्या तपश्चर्येचा होता.

त्यांचे एक वाक्य आज प्रत्येक नेवासकराच्या काळजाला भिडते:''मी हरत राहिलो, पण माझं मन हरलं नाही... कारण माझ्या हृदयात अजूनही तुमच्या विश्वासाचं नितळ ठाण आहे!''

आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांचे आयुष्य हे एका सामान्य कार्यकर्त्याच्या संघर्षाचे जिवंत प्रतीक आहे. त्यांनी सहन केलेले अपमान, उभे केलेले आंदोलन आणि शेवटी मिळवलेला हा सन्मान नवीन पिढीसाठी नेहमीच मार्गदर्शक ठरेल. त्यांच्या नेतृत्वाखाली नेवासा तालुक्याचा संपूर्ण कायापालट व्हावा, हीच आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील जनतेची सदिच्छा आणि अपेक्षा आहे!

**भव्य व यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!**



**जय महाराष्ट्र!**
**शब्दांकन: नरेंद्र काळे (शेतकरी)**
**संकलन: सुधीर चव्हाण**
**(तालुका प्रतिनिधी, दैनिक राष्ट्र सह्याद्री)**


## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAMES JIYAULMUSTAFAKHAN ABBASKHAN KHAN (NAME ASPER OLD PASSPORT NO.F6242744) AND JIYAUL MUSTAFAKHAN ABBASKHAN (NAME AS PER SCHOOL DOCUMENTS) TO NEW NAME AS JIYAULMUSTAFA ABBAS KHAN VIDE AADHAR NO.2725 6226 3423


# मुस्लीम समाजाच्या धार्मीक भावना दुखावल्या

## नाजीया खान विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**गंगापूर :** मुस्लीम समाजाच्या धार्मीक भावना दुखावल्याने भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक नेत्या नाजीया खान यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी फैसल बासोलान यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनात म्हटले की इस्लाम धर्मामध्ये मोहम्मद पैगंबर यांना देवाचे दूत मानले जाते व त्यांना इस्लाम धर्मामध्ये अत्यंत आदराचे स्थान असताना नाजीया खान यांनी विविध चॅनल वर मोहम्मद पैगंबर यांच्या विषयी अत्यंत धार्मीक भावना दुखवनारे कथन केले असून व्हिडीओ हा यु ट्युब, इन्स्टाग्राम,फेसबुक इत्यादी अनेक ठिकाणी सामाजिक माध्यमांवर सुपर्ण जगामध्ये प्रसिध्द झाला आहे. त्यामूळे संपुर्ण इस्लाम धर्मीयांचे, मुस्लीमांचे धार्मीक भावना दुखावल्या गेलेल्या आहेत. मोहम्मद पैगंबर यांचे आहे.

कुणालाही कोणत्याही धर्मा विषयी, पैगंबर, धर्म गुरू इत्यादींच्या विरूध्द शत्रुत्वाला प्रोत्साहन देणारे,तिव्र द्वेष पसरविणारे व धार्मीक भावना दुखविणारे शब्द बोलण्याचा अधिकार नाही. परंतू खान यांनी व्हिडीओ मध्ये बोललेले शब्द हे अत्यंत घृणास्पद, हेट स्पिच आहे. ज्यामुळे तिव्र द्वेष पसरला आहे व दोन धर्मांमध्ये शत्रुत्वाला प्रोत्साहन मिळालेले आहे म्हणजेच जातीय तेढ निर्माण झाला असल्याने नाजीया खान यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी फैसल बासोलान यांनी निवेदनाद्वरे केली आहे.निवेदनावर बासोलान यांची स्वाक्षरी आहेत.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि .०२ जुलैं २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२० ३४६ ३३७ | ३-० | १९० २८० २४४ | ३१-६०-४२-९७-०८ |

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-६ | १५० १६९ ११४ | ५२-७६-८१-३९-६० |

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १४९ २३९ ५९० | ४-१ | १४६ ४७० ३४४ | ४६-०१-२३-८५-१९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

द • ख • ल

## आदर्श गाव वाघोलीमध्ये बाल रंगभरण स्पर्धा उत्साहात



**शेवगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाघोली येथे शिक्षण व युवक विकास समितीच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी चित्रकला, बाल रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या सात शाळेतील १२३ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनेतील रंग कागदावर उतरवत त्यामध्ये कौशल्याने रंगभरण केले. राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियानात सलग तीन वर्षे राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त आदर्श गाव वाघोली ता.शेवगाव येथे ग्रामविकासाचे संकल्पक मा.उमेश भालसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दहा वर्षापासून पर्यावरण, जलसंधारण, वृक्षारोपण, कृषी, आरोग्य, अपारंपारिक ऊर्जा स्रोत, शिक्षण या क्षेत्रात व्यापक हीताने रचनात्मक काम सुरू आहे. त्याचबरोबर यावेळी ग्रा. पं. सदस्य मोहनमामा गवळी, उत्तम ब्राम्हणे, भाऊसाहेब ब्राम्हणे, गणेश ब्राम्हणे, चेतन जगदाळे, अनंत भालसिंग, अभिषेक भालसिंग, सुभाष पवार, विलास शेळके, अनिरुद्ध भालसिंग, समाधान गाडेकर, सुभाष पवार, गणेश दहातोंडे. कानिफ ब्राम्हणे पदाधिकारी व मुख्याध्यापक शोभा मंडलिक, महेश आहेर,राहुल नजन,अशोक शिपलकर, गणेश कांबळे, जयदीप राजळे, अमोल जायभाये,संजय शिरसाट,उमेश अय्या,कल्याण शिंदे, राजेंद्र ब्राम्हणे, अजय गुंजाळ, राजेंद्र दहीफळे, दत्तात्रय पवार आदी शिक्षकांनी नियोजन केले. ऋषिकेश ब्राम्हणे यांनी प्रास्ताविक केले,राहुल नजन यांनी आभार मानले.

## शिवसेनेच्या शेवगाव महिला शहर उपाध्यक्षपदी गंगुबाई आधाट

**अमरापुर :** शिंदे शिवसेनेच्या शेवगाव शहर उपाध्यक्षा पदी सौ. गंगुबाई अशोक आधाट यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल



विविध राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे शेवगाव तालुका नगराध्यक्षा अरुण मुंढे, नगरसेवक सुनिल काकडे, संजय वाघमारे.अशोक कुरूंद.विठठल उगले.सचिन आधाट, साईनाथ आधाट, आशुतोष डहाळे, रोहित काथवटे , यांनी त्यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शरद पवार गटाचे नगरसेवक वजीर पठाण यांनीही गंगुबाई आधाट यांचे अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या. या निवडीमुळे शेवगाव शहरातील महिलांचे संघटन बळकट होऊन पक्षवाढीसाठी त्या प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## शहरटाकळी विद्यालयात चित्रकला स्पर्धा



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शहरटाकळी येथे कर्मयोगी आबासाहेब काकडे जयंती पंधरवडा कार्यक्रमानिमित्त चित्रकला व रंगभरण स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील चित्रांचे परीक्षण विद्यालयाच्या प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक पोपट खताळ, सहशिक्षिका कमल तुळसे, आशा कानडे, सोनाली सुसे, अनिता दारकुंडे, निसार शेख, रामदास पांढरे, अशोक भालेराव, अमोल गाडगे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, रंगसंगतीचे चित्रांचे त्यांनी विशेष कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे नियोजन व संपूर्ण कामकाज विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष राऊत व अशोक भालेराव यांनी यशस्वीपणे पार पाडले.

## अहिल्यानगरमध्ये उद्यापासून अमृत पेठ-थेट बाजारपेठ

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर व प्रतिबिंब संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर मध्ये पुन्हा शुक्रवार पासून दि. ३,४ व ५ जुलै २०२६ रोजी शमी गणपती मंदिर हॉल,दिल्लीगेट येथे भरणार अमृत पेठ -थेट बाजारपेठ अशी माहिती संयोजकांनी दिली आहे. प्रतिबिंब संस्था व स्थानिक उत्पादकांनी तयार केलेल्या दर्जेदार उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे 'अमृतपेठ-थेट बाजारपेठ' हा विशेष उपक्रम राबवला जातो. अहिल्यानगर मध्ये मार्च व मे महिन्यात भरलेल्या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे आता पुन्हा एकदा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, ३,४ व ५ जुलै २०२६ रोजी ही अमृतपेठ थेट बाजारपेठ भरणार आहे. अमृत संस्था-अहिल्यानगर व प्रतिबिंब संस्था-अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वदेशी आणि दर्जेदार उत्पादने हे अमृतपेठ चे वैशिष्ट्य असून,ग्राहक आणि उत्पादक अशा दोघांसाठीही हा उपक्रम फायद्याचा ठरतो.

## कौटुंबिक वादातून पत्नीसह मुलांना मारहाण : पतीविरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर येथील एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या संभाजीनगर भागातील एल टी कॉलनीमध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घरगुती वादातून एका व्यक्तीने आपल्याच कुटुंबातील सदस्यांना अमानुषपणे मारहाण केली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी हा घटनेच्या रात्री दारूच्या नशेत घरी आला होता. त्याने विनाकारण वाद घालण्यास सुरुवात करून आरोपीने घरातील व्यक्तींना शिवीगाळ केली. तसेच रागाच्या भरात लाथाबुक्क्यांनी मारहाण करून विटेने पत्नी व मुलांना मारहाण केल्यांने दोघेजण गंभीर जखमी झाले. तसेच पीडितांना जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत पीडित महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी पतीविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पोलीस अधिकारी सखोल तपास करीत आहे. घटनेनंतर आरोपी पसार झाला असून पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत. पुढील तपास पोलीस अंमलदार सुशीत सूर्यभान दिवटे हे करित आहेत.

## भांडण सोडविणाऱ्या चालकावर हल्ला ; गुन्हा दाखल

**अहिल्यानगर :** आपल्या मित्राचे सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करणाऱ्या एका व्यक्तीवर आरोपींनी रागाच्या भरात फरशीच्या तुकड्याने प्राणघातक हल्ला करून गंभीर जखमी केले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, योगेश रोहीदास दातरंगे (ड्रायव्हर, रा. नालेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी रुख्मिणी ऊर्फ चांदणी रायकर, अशोक रायकर व एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. २९ जून रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास टांगेगल्ली परिसरात हि घटना घडली. यावेळी जखमीला जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.

# तीन वर्षांनंतर वन पर्यटन केंद्र सुरु; मात्र दुरावस्थेने दैना!

## लाखो रुपयांची सौर यंत्रणा निष्क्रिय; चोरी, पाणीटंचाई व देखभालीच्या अभाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शेवगाव वन पर्यटन केंद्र
भाग २
प्रवीण खोमणे



**एरंडगाव :** गेल्या तीन वर्षांपासून बंद असलेले वन पर्यटन केंद्र अखेर जनतेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि पत्रकारांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर सोमवारपासून पर्यटकांसाठी खुले करण्यात आले. मात्र केंद्राचे कुलूप उघडताच आत समोर आलेले वास्तव धक्कादायक असून, वन विभागाच्या निष्काळजी कारभाराचे विदारक चित्र उघड झाले आहे.

परिसरातील अनेक झाडे जळालेल्या अवस्थेत आढळून आली. उद्यानातील दिव्यांची चोरी झाल्याचेही निदर्शनास आले. पिण्याच्या पाण्यासाठी असलेली विहीर पूर्णपणे कोरडी पडली असून, विहिरीवर बसविण्यात आलेल्या सौरऊर्जे वरील साडेसात हॉर्सपॉवर क्षमतेच्या पंपाचा स्टार्टर चोरीला गेला आहे. याशिवाय पंपाच्या विद्युत वायर देखील चोरट्यांनी लंपास केल्याने संपूर्ण सौर यंत्रणा निष्क्रिय झाली आहे.

पर्यटन केंद्रावर रात्रीच्या वेळी देखभालीचे काम करणारे वनमजूर चंद्रभान चितळे यांनी सांगितले की, गेल्या दीड महिन्यापासून विहिरीत पाणी उपलब्ध नाही. स्टार्टर चोरीला गेल्यानंतर अद्याप नवीन स्टार्टर बसविण्यात आलेला नसून, मोटारीचा वीजपुरवठाही सुरू करण्यात आलेला नाही.

इतक्या मोठ्या प्रमाणात चोरीच्या घटना होऊ नये वन विभागाने याबाबत पोलीस स्टेशनमध्ये याबाबत साधी तक्रारही दाखल न केल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

विशेष म्हणजे या चोरीप्रकरणी अद्याप पोलिस ठाण्यात कोणतीही तक्रार दाखल करण्यात आलेली नसल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, या केंद्रावर सौरऊर्जा यंत्रणा बसविणारे ठेकेदार राम केदार यांनी सांगितले की, शासनाच्या माध्यमातून सुमारे साडेतीन ते पावणेचार लाख रुपये खर्च करून येथे सौर विद्युत प्रणाली उभारण्यात आली होती. मात्र योग्य देखभालीचा अभाव, सुरक्षेतील त्रुटी आणि सातत्याने होत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे ही संपूर्ण यंत्रणा आज निष्प्रभ ठरली आहे. परिसरातील साहित्याची चोरीही वारंवार होत असल्याचे त्यांनी सांगितले.

संबंधित वन पर्यटन केंद्रामधील विहिरीवरील सौर ऊर्जावर चालणारी साडेसात हार्स पॉवर क्षमता असणाऱ्या विद्युत मोटारीच्या स्टार्टर ची किंमत ३५ ते ४० हजार रुपये असल्याचे समजते.

वन पर्यटन केंद्र पर्यटकांसाठी खुले करण्यात आले असले, तरी तेथील मूलभूत सुविधांची झालेली दुरवस्था, पाणीटंचाई, चोरीच्या घटना आणि सुरक्षा व्यवस्थेचा अभाव पाहता वन विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. केंद्राचा दर्जा उंचावण्यासाठी तातडीने दुरुस्तीची कामे, प्रभावी सुरक्षा व्यवस्था आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी पर्यटक व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## फिरोदिया शिवाजियन्स एफसी युनिटी गोल्डन कप विजेता

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** भुईकोट किल्ला येथील मैदानावर युनिटी फुटबॉल क्लबच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित युनिटी गोल्डन कप फिरोदिया शिवाजियन्स संघाने पटकाविला. ७-अ-साईड फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब संघाने सुमन एंटरप्रायझेस फुटबॉल क्लब सडन डेथ पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

अत्यंत अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात निर्धारित वेळेत दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आल्याने सामना ०-० असा बरोबरीत राहिला. त्यानंतर झालेल्या पेनल्टी शूटआऊटमध्येही दोन्ही संघांमध्ये चुरस कायम राहिल्याने निकाल सडन डेथमध्ये गेला. सडन डेथमध्ये फिरोदिया शिवाजियन्सच्या खेळाडूंनी अचूक फटके मारत ४-३ असा विजय मिळवून चषकावर आपले नाव कोरले. या विजेतेपदासह फिरोदिया शिवाजियन्सने सलग तिसऱ्या स्पर्धेचे विजेतेपद पटकावत आपली विजयी घोडदौड कायम राखली.

## खांडगाव शाळेत पालक मेळावा उत्साहात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**करंजी :** विद्यार्थ्यांना बालवयातच शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी जीवनात शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आजच्या बदलत्या सामाजिक जीवनात पालकांनी अधिक जागरूक राहणे गरजेचे असून, आपल्या पाल्यावर योग्य संस्कार, विश्वास आणि नीतिमूल्ये रुजवणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन संस्थेचे विश्वस्त अनंत महाराज तनपुरे यांनी केले. खांडगाव येथील सद्गुरु इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित भव्य पालक-शिक्षक मेळाव्यात बोलत होते.या परिसरातील पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विद्यालयाचे प्राचार्य सुहास मुरुडे यांनी शाळेची शिस्त, शैक्षणिक कार्यक्रम, भौतिक साधनसामुग्री आणि आगामी काळात राबवल्या जाणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.पुढे बोलताना प्राचार्य मुरुडे म्हणाले,विद्यार्थी हा कुटुंब, समाज आणि शाळा या तीन प्रमुख घटकांशी जोडलेला असतो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास याच तीन घटकांवर अवलंबून असतो. शाळा आणि कुटुंब हे समाजाचेच भाग असल्याने शिक्षक व पालक यांच्यात उत्तम संवाद असणे अत्यंत आवश्यक आहे. या संवादामुळे विद्यार्थ्यांच्या चुका वेळेत दुरुस्त करून त्यांचा शैक्षणिक विकास साधणे अधिक सोपे होते.

यावेळी मेळाव्यात उपस्थित पालकांनी शाळेच्या शिस्तीबद्दल आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल पूर्ण समाधान व्यक्त केले. शिक्षकांशी संवाद साधताना पालकांनी अत्यंत विश्वासाने सांगितले की, आमचे पाल्य हे तुमचेच पाल्य समजून त्यांना योग्य ते मार्गदर्शन करा. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी वेळप्रसंगी कडक शासन केले तरी चालेल, मात्र त्यांना उत्तम नागरिक बनवा.

### विनाअट सरसकट कर्जमाफी व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर

## आ. रोहित पवारांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**जामखेड :** शेतकऱ्यांना विनाअट सरसकट कर्जमाफी मिळावी, यासाठी सातत्याने आवाज उठवत असलेले आमदार रोहित पवार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटींबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भातही त्यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून त्यावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. या अटींमुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता असल्याचं आकडेवारीसह मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत त्या तातडीने हटवण्याची मागणी त्यांनी केली.

विनाअट सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी आ. रोहित पवार यांनी यापूर्वी पंढरपूरमध्ये 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलन केलं होतं. या आंदोलनानंतर मंत्री गिरीश महाजन यांनी सरकारशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने रोहित पवार यांनी पुन्हा 'एल्गार अन्नदात्याचा' या नावाने छत्रपती संभाजीनगरमध्ये मोठं आंदोलन उभारलं. या आंदोलनाला राज्यभरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यावेळीही मंत्री गिरीश महाजन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक आयोजित करण्याचं आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आलं होतं. त्या आश्वासनानुसार आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार रोहित पवार यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मंत्री गिरीश महाजन, ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, आमदार संदीप क्षीरसागर, कैलास पाटील, राजू खरे, अभिजित पाटील तसेच डॉ. अनिकेत देशमुख उपस्थित होते.

बैठकीत सरकारने नेमलेल्या परदेशी समितीच्या अहवालानुसार कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नसल्याचं सांगण्यात आलं. असा इशारा यावेळी आ. रोहित पवार यांनी दिला.

## बोल्हेगाव परिसरात पोलिसांचा छापा



### ६ गावठी दारू अड्ड्यावर कारवाई

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** तोफखाना पोलीस स्टेशनच्या वतीने आज बोल्हेगाव परिसरामध्ये चालू असलेल्या दारू अड्ड्यांवर अचानकपणे मोठा छापा टाकण्यात आला. या धडक कारवाईत पोलिसांनी तब्बल ६ दारू अड्डे पूर्णपणे उद्ध्वस्त केले आहेत. पोलिसांच्या या अचानक झालेल्या कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर दारू विक्रेत्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून त्यांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तोफखाना पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रमिला गायकवाड, पोलीस कर्मचारी दिनेश मोरे आणि हेमंत झिने हे कर्तव्यावर असताना त्यांना गुप्त बातमीदाराकडून एक महत्त्वाची माहिती मिळाली. बोल्हेगाव येथील गांधीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर, बाभळीच्या झाडाच्या आडोशाला एक इसम बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टीच्या दारूची विक्री करत असल्याची ती खात्रीशीर बातमी होती.

या माहितीची गांभीर्याने दखल घेत, वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या सूचनेनुसार पोलीस पथकाने दोन पंचांना सोबत घेतले आणि खाजगी वाहनाने तात्काळ घटनास्थळ गाठले. पोलिसांची चाहूल लागताच दारू खरेदी करण्यासाठी उभे असलेले ग्राहक तिथून पळून गेले. मात्र, पोलिसांनी तत्परता दाखवून दारू विकणाऱ्या मुख्य आरोपीला जागीच ताब्यात घेतले. पोलिसांनी घटनास्थळावरून रासायनिक तपासणीसाठी दारूचा नमुना राखून ठेवला असून, उर्वरित सर्व बेकायदेशीर मुद्देमाल पंचांसमक्ष जागीच नष्ट केला आहे. महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रमिला गायकवाड यांच्या तक्रारीवरून आरोपी राम भाऊ खलाटे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## प्रोफेसर चौकातील कचरा संकलन केंद्र तातडीने हलविण्याची नगरसेवकांची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** मनपा प्रभाग क्रमांक ७ मधील प्रोफेसर कॉलनी चौक येथे असलेले महापालिकेचे कचरा संकलन केंद्र तातडीने अन्यत्र हलविण्यात यावे, अशी मागणी प्रभागातील नगरसेवकांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. या मागणीची गंभीर दखल घेत महापौरांनी प्रत्यक्ष कचरा संकलन केंद्राची पाहणी करून प्रशासनाला तातडीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

प्रोफेसर कॉलनी चौक येथील या कचरा संकलन केंद्रावर सावेडी उपनगरातील विविध भागांतील कचरा घंटागाड्यांद्वारे एकत्रित आणला जातो. त्यानंतर येथून कॉम्पॅक्टरच्या माध्यमातून तो बुरुडगाव कचरा डेपो येथे पाठविला जातो. मात्र या केंद्रामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात कचऱ्यातील घाण रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

यावेळी नगरसेवक सतीश शिंदे म्हणाले की, प्रोफेसर कॉलनी चौक येथील कचरा संकलन केंद्र हटविण्याचा प्रश्न तातडीने मार्गी न लावल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल. या केंद्रामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असून वेळोवेळी प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही. महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या असून प्रशासनाने त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

# बालिकाश्रम रोड परिसरात विजेचा लपंडाव

## वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास वीज उपकेंद्राला टाळे ठोकणार : अनिल बोरुडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

### कमी-जास्त व्होल्टेजमुळे घरातील विद्युत उपकरणांचे नुकसान नागरिकांना आर्थिक फटका



**अहिल्यानगर :** सावेडी उपनगरातील सावेडी, बालिकाश्रम रोड, सुडके मळा, बोरुडे मळा, धर्माधिकारी मळा, भुतकरवाडी, भिंगारदिवे मळा आणि शिंदे मळा या परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून विजेचा अक्षरशः लपंडाव सुरू असून वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सतत कमी-जास्त होणाऱ्या विद्युत प्रवाहामुळे घरातील टीव्ही, फ्रीज, पंखे, पाण्याच्या मोटारी तसेच इतर महागडी विद्युत उपकरणे जळत असून नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दैनंदिन कामकाज, विद्यार्थ्यांचा अभ्यास, नोकरदारांचे ऑनलाइन काम तसेच व्यावसायिकांचे व्यवहार यावरही याचा विपरीत परिणाम होत असून नागरिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

या गंभीर प्रश्नाची दखल घेत माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे आणि पुष्कर कुलकर्णी यांनी महावितरण प्रशासनाला कडक इशारा दिला आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, येत्या आठ दिवसांत सावेडी उपनगरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला नाही, वारंवार होणारे ट्रिपिंग आणि कमी-जास्त व्होल्टेजचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला गेला नाही, तर सावेडी येथील महावितरणच्या वीज उपकेंद्राला टाळे ठोकून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.

त्यांनी पुढे सांगितले की, महावितरणने नागरिकांना अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा करणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे. वारंवार होणाऱ्या बिघाडामुळे नागरिकांच्या घरातील लाखो रुपयांची विद्युत उपकरणे खराब होत आहेत. या नुकसानीची जबाबदारी महावितरण प्रशासनाने स्वीकारून तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात.

सावेडी उपनगरातील नागरिकांनीही वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करत प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अन्यथा जनआंदोलन उभारण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

द•ख•ल

## सेवाभारती'ने उभारला महुडे माळेवाडीत जलशुद्धीकरण प्रकल्प

**भोर :** तालुक्यातील महुडे ग्रामपंचायत आणि सेवा भारती प.महाराष्ट्र प्रांत यांच्या सहयोगाने माळेवाडी महुडे खु.(ता. भोर )येथे नव्याने बसविण्यात आलेल्या जलशुद्धीकरण यंत्राचा लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला.तालुक्यातील दुर्गम आणि डोंगरी भागातील बहुतांश गावात नदी तसेच विहिरीतुन आणलेले पाणी नळाद्वारे पिण्यासाठी पुरवले जाते.मात्र अशुध्द पाणी व त्यामुळे होणारे



आजार लक्षात घेऊन सेवाभारती व महुडे ग्रामपंचायत यांच्या एकत्रित प्रयत्नातून जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला.महुडे माळेवाडी येथील जलशुद्धीकरण यंत्र कार्यान्वित झाले असून ग्रामस्थांना आता पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळणार आहे.जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यवाह डॉ. प्रविण दबडघाव, सेवाभारतीचे प. महाराष्ट्र प्रांत सचि प्रदीप सबनीस, सहसचिव प्रविण देशपांडे, कोषाध्यक्ष सुधीरजी जवळेकर, आरोग्य आयाम प्रमुख संदीप देशपांडे,जिल्हा अध्यक्ष प्रसाद गायकवाड, सरपंच सोनाली कुमकर, नागेश तनपुरे, सागर पांगारकर, माऊली बदक, संतोष कदम तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.प्रांत सचिव प्रदीप देशपांडे यांनी प.महाराष्ट्रात सेवा भारतीच्या माध्यमातून चालणाऱ्या कामांची माहिती दिली. तसेच येणाऱ्या काळात महुडे परिसरात सेवाभारतीचे अन्य काम सुरू करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

## प्रधानमंत्री आवास योजनेत पुणे जिल्ह्यात ५,७५७ लाभार्थ्यांना २०.९९ कोटींचे अनुदान

**सासवड :-** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत पुणे जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद पुणे यांच्या माध्यमातून निधी वितरणाची प्रक्रिया वेगाने सुरू असून आतापर्यंत ६३४ एफटीओद्वारे ५,७५७ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात एकूण २०.९९ कोटी (२०९९.३५ लाख) इतके अनुदान थेट जमा करण्यात आले आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर २७ मे २०२६ पासून लाभार्थ्यांच्या खात्यात थेट निधी वर्ग करण्यास सुरुवात करण्यात आली. तालुकानिहाय पाहता इंदापूर तालुक्यात सर्वाधिक १,८६९ लाभार्थ्यांना ६३८.३५ लाख, भोर तालुक्यात ६७० लाभार्थ्यांना २५९.१५ लाख, बारामती तालुक्यात ६३७ लाभार्थ्यांना २२९.७० लाख, जुन्नर तालुक्यात ५०५ लाभार्थ्यांना २०३.५५ लाख, खेड तालुक्यात ५०३ लाभार्थ्यांना १५६.७० लाख, वेल्हे तालुक्यात ४२८ लाभार्थ्यांना १७२.०५ लाख, आंबेगाव तालुक्यात २८१ लाभार्थ्यांना १०७.८० लाख, दौंड तालुक्यात २८० लाभार्थ्यांना १००.५० लाख, मावळ तालुक्यात १५६ लाभार्थ्यांना ६९.८५ लाख, शिरूर तालुक्यात १५४ लाभार्थ्यांना ५२.६० लाख, पुरंदर तालुक्यात १४३ लाभार्थ्यांना ५८.५५ लाख, हवेली तालुक्यात ६२ लाभार्थ्यांना २१.४० लाख आणि मुळशी तालुक्यात ६९ लाभार्थ्यांना २९.१५ लाख इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे. लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट निधी जमा होत असल्याने वितरण प्रक्रियेत पारदर्शकता वाढली असून घरकुल बांधकामालाही गती मिळत आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद पुणे यांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना वेळेत अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यवाही सुरू असून शासनाच्या 'सर्वांसाठी घर' या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

## कृषी दिनानिमित्त आळंदी नगरपरिषदेत कै.वसंतराव नाईक यांना अभिवादन

**आळंदी :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी आळंदी नगरपरिषदेत त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. राज्यभर हा दिवस 'कृषी दिन' म्हणून उत्साहात साजरा केला जात असून, आळंदीतही नगरपरिषदेच्या वतीने कृषी क्षेत्रातील त्यांच्या ऐतिहासिक योगदानाचे स्मरण करण्यात आले.



यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर, मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगरसेवक रामचंद्र भोसले, सागर कुऱ्हाडे, संतोष रासकर, गोविंद कुऱ्हाडे, सुनिल घुंडरे तसेच नगरसेविका वैजयंता उमरगेकर, अरुणा घुंडरे, साक्षी कुऱ्हाडे, पूजा घुंडरे, ऋतुजा तापकीर, खुशी बोरुंदीया, अर्चना तापकीर आणि नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी कै. वसंतराव नाईक यांच्या स्मृतींना उजाळा देत शेती, ग्रामीण विकास आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले, ''कै. वसंतराव नाईक यांनी शेतीला विकासाचा केंद्रबिंदू मानत शेतकऱ्यांच्या हितासाठी दूरदृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. हरितक्रांतीला गती देत त्यांनी महाराष्ट्राच्या कृषी विकासाचा भक्कम पाया रचला. त्यांचे विचार आणि कार्य आजही प्रेरणादायी असून, कृषी क्षेत्राच्या प्रगतीसाठी त्यांचा आदर्श पुढील पिढ्यांनी जपला पाहिजे.''

## शिरुरमध्ये विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी तिघांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे, :** शिरुर शहरातील काजल प्रदीप ओव्हाळ या विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे विवाहितेचा पती प्रदीप ज्ञानेश्वर ओव्हाळ, सासू रंजना ज्ञानेश्वर ओव्हाळ व नणंद सुषमा पाडळे या तिघांवर विवाहितेस आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरुर शहरातील गोलेगाव रोड लगत सुंदर सृष्टी सोसायटी समोर राहणाऱ्या काजल ओव्हाळ हिस पती व सासू वारंवार घरगुती कारणातून त्रास देऊन तिचा शारीरिक व मानसिक छळ करत होते, तर काजल हिची नणंद सुषमा पाडळे हि वारंवार घरी येऊन काजलला शिवीगाळ, दमदाटी करुन तिचा छळ करत होते, तर काजल हिने २७ जून रोजी पती, सासू व नणंद यांच्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून घरात साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली, सदर घटनेत काजल प्रदीप ओव्हाळ (वय २५ वर्षे रा. शिरुर गोलेगाव रोड ता. शिरुर जि. पुणे) हिचा मृत्यू झाला, याबाबत भिम्दास तुकाराम रोकडे (वय ६२ वर्षे सध्या रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. वीर ता. पुरंदर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी विवाहितेचा पती प्रदीप ज्ञानेश्वर ओव्हाळ व सासू रंजना ज्ञानेश्वर ओव्हाळ (दोघे रा. शिरुर गोलेगाव रोड ता. शिरुर जि. पुणे) व नणंद सुषमा पाडळे (रा. ढोकसांगवी ता. शिरुर जि. पुणे) या तिघांवर गुन्हा दाखल करत प्रदीप ज्ञानेश्वर ओव्हाळ यास अटक केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हनुमंत नकाते हे करत आहे.

# आषाढी पालखीसाठी माऊलींचा देखणा रथ सज्ज

## परंपरेचा मान राखत नव्या तंत्रज्ञानाची जोड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी यंदा परंपरेला आधुनिकतेची जोड देत एक वैशिष्ट्यपूर्ण आणि देखणा रथ साकारण्यात येत आहे. आळंदीजवळील चिंबळी येथे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हा नवा रथ तयार होत असून, यामुळे पालखी सोहळा अधिक सुलभ, सुरक्षित आणि भाविकाभिमुख होणार असल्याची माहिती देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे यांनी दिली.



सुमारे दीड टन वजनाचा हा नवा रथ पारंपरिक रथाच्या तुलनेत तब्बल एक टनाने हलका करण्यात आला आहे. यापूर्वीचा चांदीचा रथ सुमारे अडीच टन वजनाचा असल्याने तो ओढताना बैलांना मोठा ताण सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन नव्या रथाच्या उभारणीत वजन कमी करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच रथाची उंचीही काही प्रमाणात कमी करण्यात आली आहे.

डीआरडीओच्या मार्गदर्शनाखाली आणि अष्टेकर ज्वेलर्सच्या सहकार्याने रथावर सिल्व्हर इलेक्ट्रोप्लेटिंगचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. रथातील बॅटरी काढून त्याऐवजी अत्याधुनिक बेअरिंग आणि कपलिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आल्याने रथाची हालचाल अधिक सहज आणि सुरळीत होणार आहे. सुमारे २० ते २५ लाख रुपये खर्चून तयार होत असलेला हा रथ भाविक, बैल किंवा ट्रॅक्टरच्या सहाय्याने सहज ओढता येणार आहे. वारीपूर्वी रथाची प्रत्यक्ष चाचणीही घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

नव्या रथाच्या रचनेत पारंपरिक सौंदर्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा समतोल साधण्यात आला आहे. रथावरील वरचा भाग फायबरमध्ये तयार करण्यात आला असून त्यावर सिल्व्हर इलेक्ट्रोप्लेटिंगमुळे आकर्षक झळाळी दिसून येणार आहे. रथावर आठ खांब उभारण्यात आले असून त्यावर चांदीचे नक्षीकाम कायम ठेवण्यात आले आहे. सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा बदल म्हणजे रथावर आठ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. तसेच रथावर गरुड आणि हनुमान यांच्या देखण्या प्रतिमा साकारण्यात आल्या असून अग्रभागी माऊलींच्या मूर्तीसह सूर्य, गरुड, हनुमान तसेच जय-विजय यांच्या आकर्षक प्रतिकृती विराजमान असतील. आगामी ८ जुलै रोजी होणाऱ्या प्रस्थान सोहळ्यापूर्वी हा आधुनिक, सुरक्षित आणि कलात्मक रथ माऊलींच्या सेवेत दाखल होणार असून, यंदाच्या आषाढी वारीचे हे एक विशेष आकर्षण ठरणार आहे.

# पुणे झेडपीत स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा

## जिल्ह्यातील एकूण १६ प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्यावतीने आयोजित कृषी दिन कार्यक्रमात जिल्ह्यातील एकूण १६ प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभापती अमोल नलावडे, समाज कल्याण समिती सभापती जितेंद्र बडेकर, सार्वजनिक बांधकाम व आरोग्य समिती सभापती दिपाली हुलावळे, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, सदस्य दिपाली गव्हाणे, रुपाली झेंडे, शीतल कांबळे, कृषी आयुक्तालयाचे विभागीय



कृषी सहसंचालक संभाजी ठाकूर, जिल्हा कृषी अधिकारी अजित पिसाळ, सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. राजेंद्र वासनिक, कृषी उपसंचालक रोहन भोसले शेतकरी, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळाचे प्रशिक्षक हेमंत जगताप, कृषी व पशुसखी उपस्थित होते. श्री. नलावडे म्हणाले, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या लोकाभिमुख कामांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जिल्हा परिषदेच्यावतीने काम करण्यात येत आहे. जिल्ह्यातील अंगणवाडी प्रकल्प, शाळांमध्ये कृषी दिन साजरा करण्यात आला आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्ह्यात डॉक्टर आपल्या दारी उपक्रम राबविण्यात येत असून लाखो शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत आहे. उमेद अभियानाअंतर्गत जिल्ह्यात महिला बचत गटांना सुमारे ५०० कोटी रुपयांचा निधींचे वाटप करण्यात आले आहे. संकट काळात बळीराजाच्या पाठीमागे भक्कमपणे उभ राहण्याकरिता कृषी कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्यावतीने काम करण्यात येईल, या कार्यक्रमात करण्यात आलेल्या सूचनांबाबत सकारात्क विचार करण्यात येईल, असेही श्री. नलावडे म्हणाले. श्री. बडेकर म्हणाले, राज्याच्या जडणघडणीत शेतकऱ्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्यांना आधार देण्याकरिता त्यामुळे कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्यावतीने जिल्ह्यात काम करण्यात येत आहे. कृषी क्षेत्रात विविध योजना व नाविन्यपूर्ण उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. येत्या काळात राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने जिल्ह्यातील एका शेतकऱ्यांना कृषी भूषण पुरस्कार देण्याची सूचना यावेळी श्री. बडेकर यांनी केली. श्री. काकडे म्हणाले, एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंवर्धनाच्यादृष्टीने हवेली तालुक्यात जलतारा प्रकल्पाची योजना राबविण्यात येत आहे. .

## शिरुरमध्ये सार्वजनिक रस्त्यावर पोकलेन चालवून नुकसान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिरुर शहरातील शिरुर अन्नापूर रस्त्यावर पोकलेन चालवून रस्त्याचे नुकसान केल्याची घटना घडली असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने शिरुर पोलीस स्टेशन येथे शंभू शरद कालेवार याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरुर शहरातील शिरुर ते अन्नापूर राज्य मार्ग क्रमांक १०३ या रस्त्यावर एक व्यक्ती कोणतीही परवानगी नसताना चैनचे पोकलेन चालवत असल्याने रस्ता उखडला जात असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली, त्यांनतर सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता एका पोकलेन चालकाने रस्त्यावर पोकलेन चालवून रस्त्याचे अंदाजे चार लाख रुपयांचे नुकसान केले असल्याचे दिसून आले, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता बाबासाहेब साहेबराव गाडेकर (वय ३२ वर्षे रा. सुंदर सृष्टी सोसायटी शिरुर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी शंभू शरद कालेवार (रा. शिरुर ता. शिरुर जि. पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार श्रीनाथ जगताप हे करत आहे.

## डॉक्टर्स डे निमित्त चिंतामणी हॉस्पिटलच्या डॉक्टरांचा सन्मान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** १जुलै हा जागतिक डॉक्टर्स डे असून या दिवसाचे औचित्य साधून सासवड येथील प्रतिथयश अशा चिंतामणी रुग्णालयातील डॉक्टरांचा सन्मान करून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. सासवडसह पुरंदर व जिल्ह्यात सामाजिक कामात कायम आघाडीवर असलेल्या स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने हा गौरव सोहळा पार पडला. ''माणसातला देवमाणूस ''या शीर्षकांतर्गत एक प्रतिमा व गुलाब पुष्प देवून या प्रसंगी सर्व डॉक्टर्स मंडळींना सन्मानीत करण्यात आले

चिंतामणी हॉस्पिटलचे डॉ भास्कर अत्राम, डॉ दिलीप वाघोलीकर, डॉ संजय रावळ, डॉ विनायक बांदेकर, डॉ संध्या खळदकर, डॉ भालचंद्र दिक्षित, डॉ आम्रपाली वीर कृष्णा शेट्टी यांचा प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप व सचिव हेमंत ताकवले यांनी सन्मान केला. चिंतामणी हॉस्पिटलला नुकतीच वीस वर्षे पूर्ण झाली त्याबद्दल याच कार्यक्रमात केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स तसेच परिचारिका यावेळी उपस्थित होत्या.प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्व डॉक्टर्सनी अभिनंदन केले.

## पशुपालकांनी 'डॉक्टर आपल्या गावी' उपक्रमाचा लाभ घ्यावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** पुरंदर तालुक्यातील पशुपालकांना गावातच विविध पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद पुणेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत 'डॉक्टर आपल्या गावी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील १९ पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या माध्यमातून दर बुधवारी सर्वचिकित्सा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून, पशुपालकांना गावातच पशुवैद्यकीय उपचार व मार्गदर्शन मिळणार आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन समितीचे सभापती अमोलजी नलावडे तसेच उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास), जिल्हा परिषद पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. शिबिरांमध्ये जनावरांचे प्रतिबंधात्मक लसीकरण, गोचीड व गोमाशा निर्मूलन, जंतनाशक औषधांचे वाटप, गर्भतपासणी, वंध्यत्व निवारण तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे पशुपालकांचा वेळ, श्रम आणि खर्चाची बचत होणार असून, जनावरांचे आरोग्य जपण्यासाठी आवश्यक सेवा गावातच उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे पशुपालकांना शासकीय योजनांचाही अधिक प्रभावीपणे लाभ मिळणार आहे. दर बुधवारी आयोजित करण्यात येणाऱ्या या सर्वचिकित्सा शिबिरांचा पुरंदर तालुक्यातील सर्व पशुपालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. अस्मिता सताळकर, स.आ.पं.स., तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी, ता. पुरंदर, जि. पुणे यांनी केले आहे.




# शिंदोडीत रेकॉर्डवरील गुन्हेगारांची दहशत दाखवत सर्रास विटभट्ट्यांना बेकायदेशीर मातीपुरवठा

## महसुल-पोलिसांचे जाणीवपुर्वक दुर्लक्ष...?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**रांजणगाव गणपती :-** शिरुर तालुक्यातील शिंदोडी गावात शेतीच्या नावाखाली सर्रास विटभट्ट्यांना बेकायदेशीर मातीपुरवठा उघडपणे सुरु असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. गावातीलच एका मातीचोर रेकॉर्डवरील गुंडाना गावात आणुन त्यांच्या दहशतीच्या जोरावर घोड नदीतील मातीचे उत्खनन करुन विटभट्ट्यांना मातीचा पुरवठा सुरु असुन शिरुरचा महसुल विभाग आणि पोलिस प्रशासन याकडे जाणीवपुर्वक कानाडोळा करत असल्याची सगळीकडे दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे.

शिंदोडी येथील घोडनदीपात्रात दिवसरात्र जेसीबी, पोकलेन आणि डंपरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर मातीचा उपसा केला जात असुन शेतीच्या नावाखाली प्रत्यक्षात व्यावसायिक स्वरुपात मातीची विक्री केली जात असल्याने शासनाचा लाखों रुपयांचा महसूल बुडत असून पर्यावरणाचेही मोठे नुकसान होत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या प्रकाराला विरोध करणाऱ्यांवर दबाव आणला जातो. त्यामुळे अनेक नागरिक उघडपणे तक्रार करण्यास घाबरत आहेत.

**प्रशासन जाणीवपुर्वक दुर्लक्ष करतंय कां...?**

शिंदोडी गावातील हा मातीचोर स्वतःच्या फायद्यासाठी बाहेरील गावातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा दहशत करण्यासाठी वापर करत असल्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरु असलेला माती उपसा महसूल विभाग आणि पोलिसांच्या नजरेतून कसा सुटतो, असा सवाल उपस्थित होत आहे. संबंधित यंत्रणा 'चिरीमिरी' घेऊन या सगळ्या प्रकाराकडे जाणूनबुजून डोळेझाक करत आहेत का...? असा संशयही ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

**एखादा जीव गेल्यानंतरच कारवाई होणार का...?**

शिंदोडी गावात शेतीच्या नावाखाली विटभट्टीसाठी चाललेला बेकायदेशीर माती उपसा, वाहतूक आणि विक्रीचे हे रॅकेट तातडीने उद्ध्वस्त केले जाणार की नाही...? एखाद्याचा जीव गेल्यावरच प्रशासन जागे होणार आहे का...? असा प्रश्न ग्रामस्थांना पडला असुन जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी पाहणी करुन संपुर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, संबंधितांवर गुन्हे दाखल करुन यंत्रसामग्री जप्त करावी आणि या प्रकाराला पाठीशी घालणाऱ्यांवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत पीडितांना वेळेत अर्थसहाय्य मिळावे आणि कागदपत्रांच्या अभावामुळे कोणतेही प्रकरण प्रलंबित राहू नये, यासाठी पोलीस विभागाने जातीचे दाखले, वैद्यकीय प्रमाणपत्रे व अन्य आवश्यक कागदपत्रे समाजकल्याण विभागाकडे तातडीने उपलब्ध करून द्यावीत, अशा सूचना जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे सदस्य सचिव तथा सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय बैठकीस समितीचे शासकीय व अशासकीय सदस्य उपस्थित होते. बैठकीत अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसह पीडितांना तातडीने न्याय व आर्थिक मदत मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी तालुकास्तरावर जनजागृती व जातीय सलोखा वृद्धिंगत करण्यासाठी कार्यशाळा आयोजित कराव्यात, पोलीस विभागाने वस्तुस्थितीची पडताळणी करून आवश्यक त्या ठिकाणी गुन्हे दाखल करावेत, उच्च न्यायालयातील प्रकरणांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रतिनिधी नियुक्त



करावा तसेच पुढील बैठकीत उच्च न्यायालयातील प्रकरणांची संख्या सादर करावी, असे निर्देश श्री. लोंढे यांनी दिले. गुन्ह्यांची संख्या अधिक असलेल्या तालुक्यांमध्ये संयुक्त बैठका घेऊन अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार ६० दिवसांच्या आत तपास पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यावरही भर देण्यात आला. बैठकीत तालुकानिहाय प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. तसेच उपस्थित तक्रारदारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. पीडितांना वेळेत न्याय मिळावा आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीस समितीचे सदस्य सचिव तथा सहायक आयुक्त विशाल लोंढे यांच्यासह समितीचे सर्व शासकीय व अशासकीय सदस्य उपस्थित होते.

# आषाढी वारीच्या तयारीची उच्चस्तरीय पाहणी

## जर्मन हँगर, मोबाईल टॉयलेटसह वारकरी सुविधांच्या कामांना गती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी येथून प्रस्थान करणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी लाखो वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. या नियोजनाची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आळंदीत पालखी मार्गाची उच्चस्तरीय पाहणी करण्यात आली. यावेळी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांच्या निवास व स्वच्छतेच्या सुविधांसाठी आळंदी येथे उभारण्यात येत असलेल्या जर्मन हँगर तसेच मोबाईल टॉयलेट उभारणीच्या कामांचीही मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील




यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. सुरू असलेल्या कामांची गुणवत्ता, गती आणि वारकऱ्यांना उपलब्ध होणाऱ्या सुविधांचा त्यांनी आढावा घेतला. ही कामे निर्धारित मुदतीत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. पाहणी दौऱ्यात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाथरवटकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, आळंदी नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, हवेली व खेड पंचायत समितीचे पदाधिकारी, दोन्ही तालुक्यांचे गटविकास अधिकारी, हवेली पंचायत समितीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुरेश गोरे, खेड पंचायत समितीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विलास माने तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान पालखी मार्गावरील विहिरी, बोअरवेल व पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची स्वच्छता आणि क्लोरीनेशन, हॉटेल व भोजनालयांमधील अन्नसुरक्षा, परिसर स्वच्छता, धूर फवारणी, डास नियंत्रण उपाययोजना तसेच संसर्गजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी करण्यात आलेल्या उपायांचा आढावा घेण्यात आला. याशिवाय वारकऱ्यांसाठी उभारण्यात येणारी तात्पुरती मोफत आरोग्य केंद्रे, आयसीयू सुविधा, चरणसेवा केंद्रे, वैद्यकीय पथके, १०८ व १०२ रुग्णवाहिका सेवा, एएलएस व बीएलएस रुग्णवाहिकांची उपलब्धता, मुक्कामस्थळी औषधसाठा, सार्वजनिक व तात्पुरत्या शौचालयांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नियंत्रण कक्षाची सज्जता तसेच पालखी मार्ग खड्डेमुक्त ठेवण्यासाठी सुरू असलेल्या कामांचीही पाहणी करण्यात आली. वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये, तसेच वारीचा सोहळा सुरक्षित, स्वच्छ आणि सुव्यवस्थित वातावरणात पार पडावा यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# द • ख • ल

## सामाजिक कार्य ही प्रत्येकाची बांधिलकी : ॲड. नेवसे



**मिरजगाव :** सामाजिक कार्य ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याने समाजातील गरीब गरजू आणि दुर्बल घटकांना सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून सर्वांनी मदत केली पाहिजे, असे मत ॲड.स्विकार उद्धव नेवसे यांनी व्यक्त केले. कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे सद्गुरु उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष उद्धवशेठ नेवसे व ॲड.स्विकार नेवसे कुटुंबियांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून परिसरात ठिकठिकाणी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाप्रसंगी उध्दव नेवसे, डॉ.हरिष दराडे, ॲड.स्विकार नेवसे, प्रशांत बुद्धीवंत, शेखर नेवसे, डॉ.विलास कवळे, सुभाष सुर्यवंशी, सदाबापू शिंदे, सुनिल गाडे, बबन म्हस्के, बाळासाहेब नवले, भगवान शिंदे यांच्यासह आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी तसेच कर्जत येथील विशाल म्हेत्रे, रामदास हजारे, प्रा. बाळासाहेब खंडागळे, चंद्रकांत राऊत, शरद म्हेत्रे, विशाल दळवी, गणेश साखरे, उमेश घालमे, लखन साळुंखे, अमोलराजे गायकवाड, बरकत आत्तार, उमेश जेवरे, किशोर येळपणेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते.

## देवदैठण-हिंगणी शिवरस्त्याचे सीमांकन



**लिंपणगाव :** महसूल प्रशासन, ग्रामस्थ आणि शिवपानंद शेत रस्ता चळवळ यांच्या समन्वयातून श्रीगोंदा तालुक्यात शेतरस्त्यांच्या प्रश्नावर आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला. श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे तसेच भूमी अभिलेख उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि चळवळीचे दादासाहेब जंगले यांच्या उपस्थितीत देवदैठण-हिंगणी शिवरस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले. मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी सीमांकनाची प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी संबंधित सर्कल मगर मॅडम यांच्या उपस्थितीत संपूर्ण कार्यवाही पार पडली. या ऐतिहासिक कामात विश्वास गुंजाळ, तुषार वाघमारे, अमोल कौठाळे, निलेश जाधव, दगडू कौठाळे, विकास जाधव, भरत कौठाळे, सदाशिव कौठाळे, महेश कौठाळे, प्रमोद बनकर तसेच उपस्थित ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. शिवपानंद शेत रस्ता चळवळीच्या वतीने या यशस्वी उपक्रमासाठी सर्व अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ व सहकाऱ्यांना यावेळी धन्यवाद देण्यात आले.

## देवदैठण सेवापूर्तीनिमित्त जिल्हा परिषद शाळेला ५१ हजारांची देणगी



**लिंपणगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देवदैठण येथील शिक्षिका मंदा गंगाराम वाघमारे (कौठाळे) यांच्या सेवापूर्तीनिमित्त शाळेच्या शैक्षणिक विकासासाठी ५१ हजारांची देणगी देण्यात आली. ही रक्कम माजी उपसरपंच तुषार बाळू वाघमारे व शाळा व्यवस्थापन समितीकडे सुपूर्द करण्यात आली. या कार्यक्रमास देवदैठण केंद्रातील जिल्हा परिषद शाळांतील शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक संस्थेत प्रवेश प्रक्रिया



**ढोरजळगांव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहात व परिसरात फार्मसी, डी.एड, बी.एड,बी. ए, बी.एस्सी, बी.सी.ए. बी. सि. एस आदी अभ्यासक्रम चालविले जातात. शेवगाव व परिसरातील विद्यार्थ्यांना ॲडमिशन संदर्भात खूप धावपळ करावी लागते व विविध समस्यांना सामोरे जावे लागते या गोष्टीचा विचार करून सर्व कोर्सचे मार्गदर्शन एका छताखाली मागील वर्षा पासून संस्थेचे प्रमुख अँड डॉ. शिवाजीराव काकडे साहेब यांच्या संकल्पनेतून सदर सुविधा केंद्र हे आबासाहेब काकडे बी.एड. कॉलेज शेवगाव या ठिकाणी सुरू करण्यात आले आहे. पृथ्वीसिंग काकडे यांच्या हस्ते या प्रवेश प्रक्रिया व समुपदेशन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. हेमंत गांगुर्डे, प्रा. राजेंद्र बांगर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाकरिता , डॉ. प्रशांत दुकळे, डॉ. भगवान बारस्कर उपस्थित होते.

## बऱ्हाणपूर ग्रामपंचायत उपसरपंचपदी नंदा खरात यांची बिनविरोध निवड



**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्यातील बऱ्हाणपूर ग्रामपंचायतीच्या रोटेशन पद्धतीने उपसरपंचपदी सौ नंदा खरात यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी ग्रामसेवक अशोक नवले यांनी त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली.त्यांना लक्ष्मण मुटकुळे यांनी सहकार्य केले. ही निवडप्रक्रिया बऱ्हाणपूर ग्रामपंचायत कार्यालयामध्ये लोकनियुक्त सरपंच सौ. वैशाली सुभाष वाणी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व ग्रामपंचायत सदस्यांची बैठक बोलविण्यात आली होती. यावेळी राजेंद्र वाणी, सुभाष वाणी, निवृत्ती वाणी, योगिता डोंगरे, विद्या डोंगरे, विष्णू दिवटे, अंकुश भालेराव, मच्छिंद्र वाणी, ताराचंद दिवटे, अंबादास वाणी, परसराम वाणी, बप्पासाहेब वाणी, वामन वाणी, बाबासाहेब तंबाजी वाणी, अशोक महाराज दिवटे, भानुदास दिवटे, वसंत वाणी, डोंगरे मेजर, बबन डोंगरे, भारत वाणी, बबन दिवटे, संजय डोंगरे, पिनू डोंगरे, साहेबराव भालेराव, दत्तात्रय भालेराव, संजय भालेराव, गोरख भालेराव, सिताराम कासार, रामभाऊ डोंगरे, प्रवीण वाणी, गणेश वाणी, महादेव वाणी, बंडू वाणी, देवा वाणी, बंडू दिवटे, मोहन वानी, कडुबाळ वाणी, नानासाहेब दिवटे, शुभम दिवटे, ताराबाई दिवटे, कल्याण खरात, नाना भालेराव, अरुण खरात उपस्थित होते.

# बरसो रे मेघा... म्हणत कर्जतकरांचे वरुणराजास साकडे!

## उजाड-भकास रान व रस्त्यावर धावणारे टँकर दर्शवितात भीषणता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** जून संपला. जुलै उजाडला तरी कर्जत तालुक्यात अपवाद एक-दोन मंडळ क्षेत्र सोडता अद्याप दमदार पाऊस झाला नाही. खरीप हंगामाची पेरणीचे प्रमाण अल्प असून कर्जत तालुक्यातील बहुतांश गावात भर पावसाळ्यात रस्त्यावर पाण्याचे टँकर वाहताना दिसत आहे. आजमितीस कर्जत तालुक्यातील या १६ गावांसाठी १६ टँकर सुरू आहेत. तर खरीप पेरणीचे प्रमाण फक्त १३ ते १५ टक्केच असल्याची माहिती कृषी विभागाकडे नोंद आहे. यामुळे कर्जतकर जनतेचे डोळे वरुणराजाच्या दमदार आगमनाकडे लागले आहे.

अलनिनोचा प्रभाव आणि उशिरा दाखल झालेल्या मान्सूनने सर्वसामान्य शेतकरी चिंतातुर झाला आहे. मागील आठवड्यात महाराष्ट्र राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील काही भागात मान्सून पावसाने हजेरी दिली असले तरी कर्जत तालुक्यात अजून मान्सून बरसलाच नाही असे चित्र पहावयास मिळत आहे. मागील वर्षी अवकाळी पावसाने घातलेला धुमाकूळ आणि मान्सूनची वेळेवर झालेली हजेरी याने नदी, नाले, तलाव आणि बंधारे अक्षरशा ओसंडून वाहिले होते. तर शेतात मका, तूर, मूग, भुईमूग, बाजरी, कापूस, सोयाबीन, उडीद हिरवीगार पिके डोलात उभे राहिले होती. मात्र यंदा कर्जत तालुक्यात मृग नक्षत्रात आणि जून महिन्यात एक-दोन महसुली मंडळ अपवाद सोडता कोरडाठाकच गेला.

### जुलै महिना उजाडला तरी १६ टँकर रस्त्यावर

कर्जत तालुक्यातील १६ गावांच्या ११४ वाड्या-वस्त्यांसाठी १६ टँकर जुलै महिना उजाडला तरी रस्त्यावर धावताना दिसत आहे. २८ हजार १६० लोकसंख्येसाठी २४ खेपाद्वारे मांदळी, खेड, दुरगाव आणि पाटेवाडी तलावातून पाण्याचा पुरवठा केला जातो. मान्सून पावसाने जोरदार हजेरी न लावल्यास यात आणखी गावांची भर पडली जाईल.



### खरीप पेरणी सरासरी १३ टक्केच. मान्सून लांबनीमुळे उडीद पिकाच्या पेऱ्यात घट

कर्जत तालुक्यात १० महसुली मंडळात सरासरी १०० मिमी पावसाची नोंद झाली असून यात मिरजगाव, कोंभळी आणि माही मंडळात पावसाचे प्रमाण अधिक आहे. कर्जत तालुक्यात खरीप हंगाम सर्वसाधारण क्षेत्र ८९ हजार ६९४ हेक्टर असून आजमितीस अवघ्या १२ हजार २९० हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष पेरणी झाली आहे. यात मका, तूर, बाजरी, कापूस, उडीद आणि मुगाची लागवड करण्यात आली असून सरासरी १३.७० टक्केच खरीप पेरणीची नोंद कृषी दफ्तरी आहे.

# स्व. दादापाटील राजळे यांचे पुण्यस्मरणानिमित्त वह्यांचे वाटप व वृक्षारोपन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** तालुक्याचे भाग्यविधाते सहकार व शिक्षण महर्षी स्व. दादापाटील राजळे, यांच्या पुण्यस्मरण निमित्त दादापाटील राजळे महाविद्यालयात गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या वाटप व वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

संस्थेचे विश्वस्त उद्धवराव वाघ यांनी स्व. दादापाटील राजळे यांच्या स्मृतीस उजाळा देताना म्हटले की, पाथर्डी सारख्या दुष्काळी तालुक्यात शिक्षणाचा विकास व्हावा यासाठी स्व. भाऊंनी शिक्षण संस्थेची उभारणी केली. विद्यार्थ्यांनी भविष्यामध्ये शिक्षण, व्यवसाय व औद्योगिक क्षेत्रात उंच भरारी घ्यावी, यासाठी त्यांनी नेहमी विद्यार्थ्यांना जिद्द व चिकाटी ठेवावी असा संदेश दिला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे होते.

श्री. शिवाजी विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्षरामदास म्हस्के यांनी, पाथर्डी सारख्या दुष्काळी तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्व. भाऊंनी केलेले कार्य उपस्थितांसमोर मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर यांनी केले. याप्रसंगी त्यांनी भाऊंच्या जीवन कार्याचा आढावा घेतला. भाऊंना विद्यार्थ्यांबद्दल प्रेम व आस्था होती. ते महाविद्यालयाच्या प्रत्येक कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहत व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप करण्यात आले.

# कोरडगावात घरगुती एलपीजी गॅस टाक्यांचा व्यावसायिक गैरवापर; प्रशासनाची डोळेझाक?

**शिवाजी बोंद्रे। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** गावात घरगुती एलपीजी गॅस टाक्यांचा सर्रास व्यावसायिक उपयोग होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. हॉटेल्स, चहा स्टॉल्स, फास्टफूड केंद्रे, भजी- वडा स्टॉल्स आदी ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडर खुलेआम वापरले जात असून शासनाच्या नियमांची उघड उघड पायमल्ली होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनुसार, काही व्यावसायिकांनी खर्च वाचवण्यासाठी व्यापारी गॅसऐवजी घरगुती गॅस टाक्यांचा वापर करण्याचा मार्ग अवलंबल्याने गावात अपघाताचा धोका वाढला आहे. घरगुती गॅस सिलेंडरची सुरक्षितता मर्यादा वेगळी असते. गर्दीच्या ठिकाणी किंवा धगधगत्या चुलींच्या जवळ त्याचा व्यावसायिक वापर केल्यास स्फोटासारखे गंभीर प्रसंग घडू शकतात, असा इशारा गॅस एजन्सीतील कर्मचाऱ्यांनी दिला.

याबाबत स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत आणि



गॅस एजन्सीकडे वारंवार तक्रारी देऊनही ठोस कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांत आहे. अशी परिस्थिती राहिली तर एखादा मोठा अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

गावात तातडीने संयुक्त तपास मोहीम राबवून व्यावसायिक ठिकाणी वापरण्यात येणाऱ्या घरगुती एलपीजी टाक्यांवर कारवाई करावी, अशी मागणी वाढत आहे. नियमबाह्य व धोकादायक पद्धतीने चालणाऱ्या या गैरप्रकारामुळे कोरडगावात सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# कोरडगावात दिवसा मटका, रात्री वीजचोरी

## पोलीस व वीज विभागाच्या अपयशाने गुन्ह्यांत वाढ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव : येथे बेकायदेशीर मटका आणि वीजचोरी यांचा उच्छाद सुरू असून, पोलीस प्रशासन व विद्युत वितरण कंपनीच्या निष्क्रियतेमुळेच हे गुन्हे फोफावत असल्याचे स्पष्ट चित्र आहे. दिवसभर गावात मटक्याचे आकडे बेधडक टाकले जातात, तर रात्री विजेचे आकडे टाकून वीजचोरी केली जाते. हे सर्व खुलेआम सुरू असताना संबंधित यंत्रणा मात्र डोळ्यावर पट्टी बांधून बसल्याचा आरोप ग्रामस्थांतून होत आहे.**

मटक्याच्या व्यसनाने गावातील तरुण पिढी पूर्णतः बरबाद होत आहे. हाताला काम न करता जुगारात पैसे उडवले जात असून, घरातील संसार उद्ध्वस्त होत आहेत. अनेक तरुण व्यसनासाठी चोरीकडे वळत असल्याने गावात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. भीतीचे वातावरण पसरले असून, महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

दुसरीकडे वीजचोरीमुळे गोरगरीब आणि प्रामाणिक वीजग्राहकांचे संसार उघड्यावर आले आहेत. आकडे टाकणारे मोकाट फिरत असताना, नियमित मीटरधारकांची मात्र कनेक्शन तोडली जातात. वीज वितरण विभाग आकडेबहाद्दरांकडे डोळेझाक करत असून, 'चिरीमीरी दिल्यास आकडे डोक्यावर' अशी उघड चर्चा गावात सुरू आहे. स्पष्ट वीजचोरी दिसत असूनही अधिकारी आंधळेपणाचे सोंग घेत असल्याचा गंभीर आरोप होत आहे.

मटका अड्ड्यांबाबत पोलीस प्रशासनाची भूमिका देखील संशयास्पद आहे. अड्डे कुठे आहेत, कोण चालवत आहे, हे सर्वांना माहिती असतानाही छापे नाहीत, कारवाई नाही, गुन्हे दाखल नाहीत. त्यामुळे कायदा केवळ कागदावर असून गुन्हेगार मात्र रस्त्यावर मोकाट असल्याची भावना बळावत आहे.

ग्रामस्थांचा थेट सवाल असा आहे की, मटका आणि वीजचोरी रोखण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? पोलीस व वीज विभागाने आपली कर्तव्ये पार पाडली असती तर परिस्थिती इतकी गंभीर झाली असती का? प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई केली नाही, तर उद्रेक अटळ असल्याचा इशारा नागरिक देत आहेत.

कोरडगावात कायद्याचा दरारा निर्माण करण्यासाठी मटका अड्ड्यांवर तातडीने छापे, वीजचोरीवर निष्पक्ष कारवाई आणि दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा प्रशासनाच्या अपयशाची किंमत संपूर्ण गावाला मोजावी लागणार, हे मात्र निश्चित.

# अण्णांवर उपोषणाची वेळ येऊ देऊ नका आ. दातेंची विधानसभेत मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



छाया :दत्ता गाडगे

**पारनेर :** पावसाळी अधिवेशनामधे आमदार काशिनाथ दाते यांनी शासनाकडे भावनिक साद; माहिती अधिकाराच्या प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली आहें.

सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशन २०२७ मध्ये औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या प्रस्तावित उपोषणाचा विषय अत्यंत संवेदनशीलपणे सभागृहात उपस्थित करत शासनाला तातडीने हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले.

सभागृहात बोलताना आमदार दाते म्हणाले की, अध्यक्ष महोदय, औचित्याचा मुद्दा सुरू करण्यापूर्वी मी आपल्या माध्यमातून शासनाकडे एक महत्त्वाची विनंती करू इच्छितो. माझ्या २२४ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात पद्मभूषण अण्णासाहेब हजारे आणि पद्मश्री पोपटराव पवार यांसारखे दोन थोर समाजसेवक आहेत. माहिती अधिकार कायद्यातील सुधारणांच्या संदर्भात अण्णांनी येत्या ५ जुलैपासून उपोषणाचा इशारा दिला आहे. अण्णांचे वय आज ९० वर्षे असून अशा वयात उपोषणाचा शारीरिक त्रास सहन करणे अत्यंत कठीण आहे. त्यामुळे माझ्या पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या वतीने शासनाला विनंती करतो की, अण्णांवर उपोषण करण्याची वेळ येऊ नये, यासाठी तातडीने सकारात्मक संवाद साधून मार्ग काढावा.

आ. दाते यांनी अण्णासाहेब हजारे यांच्याविषयी व्यक्त केलेली ही आत्मीयता आणि त्यांच्या आरोग्याबाबत व्यक्त केलेली चिंता सभागृहाचे विशेष लक्ष वेधून घेत होती. मतदारसंघातील ज्येष्ठ समाजसेवकांचा सन्मान राखत, त्यांच्या आंदोलनामागील विषयावर शासनाने संवेदनशील भूमिका घ्यावी, अशी स्पष्ट अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या अण्णा हजारे यांना उपोषणासारखे टोकाचे पाऊल उचलावे लागू नये, यासाठी शासनाने तातडीने पुढाकार घ्यावा, अशी भावना आमदार काशिनाथ दाते यांनी सभागृहात मांडल्याने त्यांच्या या भूमिकेची सर्वत्र चर्चा होत आहे.

# राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त श्रीगोंद्यात विद्यार्थ्यांकडून सत्कार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त नागवडे इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थी-शिक्षकांनी विविध रुग्णालयांना भेट देत डॉक्टरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या उपक्रमातून समाजासाठी अहोरात्र सेवा बजावणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांनी ग्रामीण रुग्णालय श्रीगोंदा, मेडीकेअर हॉस्पिटल, पाटील हॉस्पिटल, मातोश्री हॉस्पिटल, सिद्धिविनायक हॉस्पिटल तसेच भापकर हॉस्पिटल येथे भेटी देऊन डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी शुभेच्छापत्रे देत त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव केला.डॉक्टरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना निरोगी जीवनासाठी स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व पटवून दिले.

विद्यार्थ्यांच्या या अभिनव उपक्रमाचे डॉक्टरांनी कौतुक करत, अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, कृतज्ञता व सेवाभावाची भावना अधिक दृढ होते, असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमास संस्थेचे निरीक्षक एस. पी. गोलांडे, मुख्याध्यापिका नीतू दुलानी, शिक्षकवृंद, विविध रुग्णालयांतील डॉक्टर व कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# 'बीएलओ' कामाच्या मानसिक तणावातून प्राथमिक शिक्षिकेचा मृत्यू

## शिक्षक समन्वय समिती आक्रमक, जिल्हाधिकाऱ्यांकडे 'ऑन ड्युटी' संरक्षणाची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** निवडणूक विभागाचे बीएलओ म्हणून राष्ट्रीय कर्तव्य बजावत असताना आलेल्या अतिताण आणि मानसिक दडपणामुळे पाथर्डी तालुक्यातील प्राथमिक शिक्षिका सुनीता उत्तमराव पोपळभट यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. या धक्कादायक घटनेमुळे प्राथमिक शिक्षक वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मृत शिक्षिकेच्या कुटुंबाला राष्ट्रीय कामाचे सर्व कायदेशीर संरक्षण व आर्थिक लाभ मिळावेत, या प्रमुख मागणीसाठी पाथर्डी तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी (अहिल्यानगर) यांना एक जाहीर निवेदन देण्यात आले आहे.

शिक्षिका सुनीता पोपळभट यांच्याकडे निवडणूक विभागाचे बीएलओ म्हणून काम सोपवण्यात आले होते. सध्या सुरू असलेल्या 'एसआयआर' मोहिमेच्या राष्ट्रीय कामकाजाचे सर्वच शिक्षकांवर प्रचंड दडपण आहे. रविवारी (दि. २८ जून) त्यांनी या कामाचे साहित्य ताब्यात घेतले होते. हे साहित्य हाती आल्यापासूनच त्या कामाच्या वाढत्या ताणाखाली व मानसिक दडपणाखाली होत्या. याच मानसिक तणावातून मंगळवारी (दि. ३० जून) त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे दुःखद निधन झाले. निवडणूक कामाच्या याच प्रचंड ताणामुळे एका निष्पाप शिक्षिकेचा बळी गेला असून, त्यांचे संपूर्ण कुटुंब आज उघड्यावर पडल्याची भावना शिक्षक बांधवांकडून व्यक्त होत आहे.



या दुर्दैवी घटनेची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी यासाठी शिक्षक समन्वय समितीने जिल्हाधिकाऱ्यांना साकडे घातले आहे. मृत शिक्षिका पोपळभट यांच्या शोकाकुल कुटुंबाला राष्ट्रीय कर्तव्यावर असताना झालेल्या अपघाताचे आणि राष्ट्रीय कामाचे सर्व प्रकारचे विमा संरक्षण तसेच तातडीचे लाभ मिळवून द्यावेत, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. तसेच, तालुक्यातील व जिल्ह्यातील इतर सर्व 'बीएलओ' कर्मचाऱ्यांना हे अत्यंत क्लिष्ट व मानसिक ताणाचे काम करत असताना प्रशासनाकडून संपूर्ण कायदेशीर आणि 'ऑन ड्युटी' संरक्षणाची लेखी हमी देण्यात यावी, अशी मागणीही या निवेदनातून करण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे आता सर्व शिक्षकांचे लक्ष लागले आहे.या सर्व मागणीचे निवेदन देण्यासाठी तालुक्यातून अनेक महिला शिक्षिका व समन्वय समितीचे सदस्य व शिक्षक नेते उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने राजेंद्र जायभाये, अर्जुन शिरसाट, कल्याण लावंडे, गीता खेडकर, जयश्री कीर्तने, भालचंद्र गर्जे, महादेव गोल्हार, मीरा मुंढे, शैला डोईफोडे बाबा जायभाये, संजय कीर्तने, रमेश वाघ,पप्पू बोरुडे,व अनेक शिक्षक बांधव उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

गुरुवार दि.०२ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# भोजदरी वृक्षलागवड महाघोटाळा; कागदावरच उगवली ७,५०० झाडे

## उपोषणानंतर वनीकरण विभागाला जाग

प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्याने आम्ही उपोषण मागे घेतले असले, तरी १५ जुलैपर्यंत दोषींवर प्रत्यक्ष फौजदारी कारवाई झाली नाही, तर यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल.

भोजदरी ग्रामस्थ व आंदोलनकर्ते

### ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या

प्रत्यक्ष पंचनामा : भोजदरी येथील लागवड क्षेत्राचा पारदर्शक पंचनामा करून प्रत्यक्षात किती झाडे जिवंत आहेत, याची सत्यस्थिती जाहीर करावी.

फौजदारी गुन्हे : शासकीय निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदारांवर तात्काळ गुन्हे दाखल व्हावेत.

झाडे जगवण्याची जबाबदारी : कागदावर दाखवलेली सर्व ७,५०० झाडे प्रत्यक्ष जागेवर लावून ती जगवण्याची संपूर्ण जबाबदारी विभागाने व ठेकेदाराने घ्यावी...



### ...आणि अधिकारी धावले १५ जुलैपर्यंत अहवाल देणार

ग्रामस्थांच्या आंदोलनाची तीव्रता आणि माध्यम वर्तुळातील खळबळ पाहता, अखेर विभागीय वन अधिकारी आणि संगमनेरचे आरएफओ सचिन धिंडले यांनी उपोषणस्थळी धाव घेतली. त्यांनी आंदोलनकर्त्यांशी सविस्तर चर्चा करून कथित भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याचे आणि दोषी अधिकारी व ठेकेदारांवर कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याचे मान्य केले. प्रशासनाने १५ जुलै २०२६ पर्यंत या संपूर्ण कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते नारळपाणी घेऊन ग्रामस्थांनी उपोषण मागे घेतले.

### राज्यव्यापी घोटाळ्याची शक्यता...

हा गैरप्रकार केवळ भोजदरी गावापुरता मर्यादित नसून, राज्यातील इतर अनेक गावांमध्येही सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून अशाच प्रकारे शासनाचा निधी लाटला गेल्याची दाट शक्यता ग्रामस्थांनी वर्तवली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : संगमनेर तालुक्यातील पठार भागातील भोजदरी गावात सामाजिक वनीकरण विभागामार्फत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या कथित वृक्षलागवड घोटाळ्याप्रकरणी पुणे येथे सुरू असलेले ग्रामस्थांचे आमरण उपोषण अखेर मागे घेण्यात आले आहे. या महाघोटाळ्याची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याचे लेखी आश्वासन विभागीय वन अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर आंदोलकांनी आपले आंदोलन तात्पुरते स्थगित केले. मात्र, प्रशासनाला १५ जुलैची 'डेडलाईन' देण्यात आली असून, कारवाई न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. भोजदरी गावात सामाजिक वनीकरण विभाग आणि संबंधित ठेकेदारांनी संगनमत करून तब्बल ७ हजार ५०० वृक्षलागवड झाल्याचे कागदोपत्री दाखवले. प्रत्यक्षात अनेक ठिकाणी एकही झाड अस्तित्वात नसून, केवळ खोटी बिले आणि मोजमाप पुस्तके (च.इ.) तयार करून शासनाचा सुमारे १ कोटी २५ लाख रुपयांचा निधी हडप केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या भ्रष्टाचारप्रकरणी ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष ज्ञानदेव मते, प्रा. भाऊसाहेब घोडके, प्रा. योगेश मते आणि ज्येष्ठ नागरिक ज्ञानदेव उगले यांनी ३ डिसेंबर २०२५ रोजीच पुणे मुख्य कार्यालयात रीतसर तक्रार दाखल केली होती. मात्र, सात महिने उलटूनही प्रशासनाने कोणतीही ठोस चौकशी न केल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी २९ जूनपासून पुणे येथील प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते.

## इलेक्ट्रिक मोटार जोडताना विजेच्या धक्क्याने एकाचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील गोटुंबे आखाडा येथे ग्रामपंचायतीच्या नळाला आलेले पिण्याचे पाणी भरण्यासाठी इलेक्ट्रिक मोटार जोडत असताना विजेचा धक्का लागून ५४ वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. १ जुलै २०२६) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भिवा विठ्ठल सुपुत्रे (वय ५४, रा. गोटुंबे आखाडा, ता. राहुरी) यांच्या घरातील इतर सदस्य कामानिमित्त बाहेर गेले होते.

दरम्यान, ग्रामपंचायतीच्या नळाला पिण्याचे पाणी आल्यानंतर पाणी भरण्यासाठी त्यांनी इलेक्ट्रिक मोटार जोडण्यास सुरुवात केली. याचवेळी त्यांना विजेचा जोरदार धक्का बसल्याने ते तोंडावर जमिनीवर कोसळले आणि जागीच त्यांचा मृत्यू झाला. काही वेळाने शेजारी राहणाऱ्या एका महिलेला भिवा सुपुत्रे हे जमिनीवर पडलेले दिसले. त्यांच्या पायाभोवती विद्युत वायर असल्याचे लक्षात येताच त्यांनी आरडाओरड केली. त्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत त्यांना तातडीने राहुरी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या दुर्दैवी घटनेमुळे गोटुंबे आखाडा परिसरात हळहळ व्यक्त होत असून सुपुत्रे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. मयत भिवा विठ्ठल सुपुत्रे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अर्जुन दारकुंडे करीत आहेत.

## साई भक्ताचे दिड लाखाचे सोने परत सफाई कामगाराचा प्रामाणिकपणा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** : जर्मनी येथील साईभक्त धनुष आपल्या कुटुंबासह शिर्डी येथे साई दर्शनासाठी आले असता. मंदिर परिसरातील गुरुस्थान जवळ त्यांच्या जवळ असलेल्या पर्स मधील १० ग्रॅम वजनाचे बाळाचे सोन्याचे दागिने व व्हिसा ते विसरून गेले हे तेथील सफाई कर्मचारी उत्तम चाबुकस्वार यांनी इमानदारीने परत केले आहे.

सदर साई भक्तांकडे सोबत पाच महिन्याचं बाळ पण होते ते दर्शना नंतर मंदिर परिसरात गुरुस्थान जवळ थांबले असत त्यांची पर्स विसरून गेले, त्यात १० ग्राम वजनाचे बाळाचे सोन्याचे दागिने (किंमत १५०,०००) व व्हिसा होता. त्यांची पर्स हरवल्याची लक्षात आल्याने त्यांचा गोंधळ उडाला कारण व्हीसा शिवाय त्यांना जर्मनीला जाणे शक्य नव्हते. त्यांनी शोधा शोध सुरू केली परंतू त्यांना ती पर्स मिळून आली नाही .त्यानंतर संस्थान चे आरोग्य विभागाचे कर्मचारी उत्तम चाबुकस्वार हे गुरुस्थान जवळ सफाई करण्यासाठी गेले असता त्यांना ते पाकीट सापडले.

त्यांनी ते प्रामाणिकपणे संरक्षण कार्यालयात जमा केले. त्यानंतर ओळख पटवून साईभक्तांना व्हिसा आणि दागिने परत केले. त्यांच्या प्रामाणिकपणा बद्दल साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांनी अभिनंदन केले आहे.

## आ. लंघे यांच्याकडून नगरविकासासह विविध विकासकामांसाठी शासनाकडे ठोस मागण्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात नेवासा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ. विठ्ठलराव लंघे यांनी प्रभावीपणे बाजू मांडत विविध महत्त्वाच्या विकासकामांसाठी शासनाकडे ठोस मागण्या केल्या. सार्वजनिक बांधकाम, नगरविकास आणि कौशल्य विकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत त्यांनी मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे, नागरिकांच्या सुरक्षिततेचे प्रश्न, धार्मिक पर्यटनाला चालना देणाऱ्या सुविधा तसेच रोजगारनिर्मितीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा मुद्दा सभागृहात मांडला.

सभागृहात बोलताना आ. लंघे यांनी नेवासा मतदारसंघातील अनेक विकासकामे निधीअभावी प्रलंबित असल्याचे सांगत ती तातडीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली. विकासकामांना गती मिळाल्यास नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठा सकारात्मक बदल होईल, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी सन १९६६ मध्ये बांधण्यात आलेल्या प्रवरा नदीवरील जुन्या पुलाचा प्रश्न उपस्थित केला. दोन तालुक्यांना जोडणारा हा पूल सध्या जीर्ण अवस्थेत असून वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर नवीन पुलासाठी सुमारे १०० कोटींची तरतूद करून काम तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. श्रीक्षेत्र देवगड येथील प्रवरा नदीवरील पादचारी पुलाचे काम जायकवाडी धरणातील पाण्याच्या वाढलेल्या पातळीमुळे रखडले असल्याचे सांगत विशेष तांत्रिक उपाययोजनांसाठी आवश्यक ३ कोटींचा अतिरिक्त निधी मंजूर करून हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. या पुलामुळे १३ गावांतील नागरिक आणि भाविकांची मोठी सोय होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



नाशिक येथे २०२७ मध्ये होणार्या कुंभमेळ्याच्या च्या पार्श्वभूमीवर नेवासा, श्रीक्षेत्र देवगड, शनि शिंगणापूर आणि परिसरातील धार्मिक स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे उन्नतीकरण, अपघातप्रवण ठिकाणांची सुधारणा, जुन्या पुलांचे पुनर्बांधकाम, विश्रामगृहांची उभारणी तसेच पर्यटन सुविधांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली. कौशल्य विकास विभागाच्या चर्चेदरम्यान मुकिंदपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) विस्तारासाठी नवीन कार्यशाळा, वर्गखोल्या, अंतर्गत रस्ते आणि आधुनिक पायाभूत सुविधांसाठी निधी मंजूर करण्याची मागणी त्यांनी केली.

ग्रामीण भागातील युवकांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी हा विस्तार आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नगरविकास विभागाच्या चर्चेत नेवासा नगरपंचायतीच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी निधी, भूमिगत गटार योजना, सिमेंट काँक्रीट रस्ते, बंदिस्त गटारे, अग्निशमन वाहन तसेच इतर नागरी सुविधांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्य योजनेत नेवासा मतदारसंघातील प्रमुख रस्त्यांचा समावेश करून त्यांचे मजबुतीकरण व नूतनीकरण करण्याची मागणीही त्यांनी केली.

नेवासा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास, नागरिकांची सुरक्षितता, धार्मिक पर्यटनाला चालना आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व विकासकामांना शासनाने प्राधान्य देऊन निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही भूमिका आमदार विठ्ठलराव लंघे यांनी विधानसभेत मांडली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नेवासा मतदारसंघातील विविध विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बोटा येथे विनापरवाना गॅस टाक्यांचा मोठा साठा जप्त, दोघांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : संगमनेर तालुक्यातील बोटा परिसरात बेकायदेशीर गॅस सिलिंडरची साठेबाजी करणाऱ्यांवर तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने धडक कारवाई केली आहे. दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणावर अवैध गॅस टाक्या जप्त करण्यात आल्या असून, दोन मुख्य संशयित आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. नुकतीच मुंजेवाडी (अकलापूर) येथे गॅस व्हॉल्व्हमध्ये वॉशर नसल्याने गळती होऊन दिनेश कापसे यांचा संपूर्ण संसार जळून खाक झाला होता. गॅस एजन्सीच्या या निष्काळजीपणाची गंभीर दखल घेत पुरवठा विभाग 'क्शन मोड'मध्ये आला आहे. २९ जून रोजी बोटा येथील जागरूक ग्रामस्थांनी पुरवठा निरीक्षण अधिकारी रसिक रत्नाकर सातपुते यांना बेकायदेशीर साठ्याची गोपनीय माहिती दिली होती. त्यानुसार ३० जून रोजी तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने बोटा येथे दोन ठिकाणी अचानक छापे टाकले.

## जागतिक शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय अंडर-१८ संघ चीनकडे रवाना



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली** : चीनमधील शांगलो येथे १ ते १० जुलैदरम्यान होणाऱ्या जागतिक शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसजीएफआय) तर्फे निवडलेला भारतीय अंडर-१८ मुला व मुलींचा संघ बुधवारी नवी दिल्लीहून चीनकडे रवाना झाला. या स्पर्धेत २६ देशांचे संघ सहभागी होणार असून भारतीय संघाकडून उल्लेखनीय कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

स्पर्धेतील गटवारीनुसार भारतीय मुलांचा संघ 'पूल सी'मध्ये असून त्यांच्यासमोर बल्गेरिया, ब्राझील आणि डेन्मार्क यांचे आव्हान असणार आहे.

तर मुलींचा संघ 'पूल एच'मध्ये असून चायनीज तैपेई, नेदरलँड्स आणि अमेरिका या बलाढ्य संघांशी त्यांची लढत होणार आहे. गट फेरीतील कामगिरीवर पुढील फेरीचे समीकरण अवलंबून राहणार आहे. स्पर्धेच्या तयारीसाठी झारखंडमधील रांची येथे ७ ते ३० जूनदरम्यान विशेष राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात खेळाडूंनी तांत्रिक कौशल्य, शारीरिक क्षमता, सांघिक समन्वय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक तयारीवर भर दिला. भारतीय मुलांच्या संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून डॉ. शैलेश कुमार (राजस्थान) यांनी जबाबदारी पार पाडली असून सहाय्यक प्रशिक्षक म्हणून गौरव डेंगळे (महाराष्ट्र) यांनी मार्गदर्शन केले. मुलींच्या संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून हेमा केळकर (रेल्वे) तर सहाय्यक प्रशिक्षक म्हणून अमित कुमार (झारखंड) यांनी संघाची जबाबदारी सांभाळली. संघाच्या शरीरसौष्ठव व पुनर्वसन तज्ज्ञ म्हणून विशाखा राठी (चंदीगड) यांनी खेळाडूंच्या तंदुरुस्तीवर विशेष लक्ष केंद्रित केले.

संघाच्या रवाना होण्यापूर्वी एसजीएफआयचे अध्यक्ष दीपक कुमार, सचिव अमरजित कुमार शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी पार्थ दोशी आणि झारखंडचे कार्यक्रम अधिकारी धीरसेन सोरेन यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत जागतिक स्तरावर भारताचा तिरंगा उंचावण्याचे आवाहन केले. या स्पर्धेत भारतीय संघ पदक पटकावेल, असा विश्वास प्रशिक्षक, अधिकारी आणि क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

## लग्नाची वरात पडली महागात; पोस्टमास्तरांची दुचाकी लंपास

**घारगाव** : संगमनेर तालुक्यातील अकलापुर येथे लग्नाच्या वरातीला गेलेल्या पोस्टमास्तरांची घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, अकलापुर येथील रहिवासी व पोस्टमास्तर संजय रामदास आभाळे (वय ५२) यांनी शनिवार (दि. २७) रोजी रात्री सुमारे १० वाजता त्यांची हिरो होंडा कंपनीची (क्र. एमएच १७ एक्स ९६२२) दुचाकी घराशेजारी लॉक करून ठेवली होती. त्यानंतर ते गावातील लग्नाच्या वरातीच्या कार्यक्रमाला गेले होते. रविवारी (दि. २८) मध्यरात्री सुमारे १ वाजता घरी परतल्यानंतर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही वाहनाचा मागमूस लागला नाही. अज्ञात चोरट्याने सुमारे ४० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाबूराव गोडे पुढील तपास करत आहेत.

## वांबोरी येथे स्थानिक गुन्हे शाखेचा बिंगोवर छापा ; दोघेजण ताब्यात



**राहुरी** : अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग पथकाने दि. ३० जून रोजी दुपारच्या दरम्यान राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे दोन ठिकाणी सुरु असलेल्या बिंगो जुगार अड्ड्यावर छापा टाकून कारवाई केली. यावेळी दोन जणांना ताब्यात घेऊन गजाआड करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार दि. ३० जून २०२६ रोजी दुपारच्या वेळी अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग पथकाने राहुरी तालुक्यातील वांबोरी बस स्थानक समोरील गाळ्यामध्ये छापा टाकला. त्यावेळी पथकाला तेथे बिंगो जुगार सुर असल्याचे दिसून आले. पोलिस आल्याची चाहूल लागताच अनेक जण तेथून पसार झाले. त्यावेळी पोलिस पथकाने दोन जुगार अड्ड्यावर कारवाई करुन तेथून एलईडी टीव्ही व जुगार खेळण्यासाठी लागणाले इतर साहित्य असा एका ठिकाणाहून २० हजार ३९० रुपये व दुसऱ्या ठिकाणाहून ३६ हजार ७८० असा एकूण ५७ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच नागेश चिमाजी देवकर (वय ३०) व प्रमोद नामदेव चोथे, (वय ३३), दोघे रा. रा. वांबोरी ता. राहुरी, यांना ताब्यात घेतले. तर अतुल सुभाष कुसमूडे आणि भारत विलास शिंदे, दोघे रा. वांबोरी, हे दोघे पसार झाले आहेत. पोलीस कॉन्स्टेबल भगवान थोरात यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

## लिफ्ट देण्याच्या बहाण्याने वृद्धाला लुटले

**घारगाव** : बहिणीकडून घरखर्चासाठी दिलेले पैसे घेऊन पायी जाणाऱ्या एका वृद्धाला लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दुचाकीवर बसवून, त्यानंतर धक्काबुक्की करत १५,८०० रुपयांची रोकड लुटल्याची धक्कादायक घटना गुंजाळवाडी शिवार येथे घडली आहे. या प्रकरणी घारगाव पोलिसांनी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सारोळे पठार येथील सावळेराम लक्ष्मण घुले हे २९ जून रोजी धांदरफळ येथील मुलीकडून एस.टी. बसने परतत होते. सायंकाळी ४ वाजता साकुर फाटा येथे बसमधून उतरून ते पायी जात असताना, एका अज्ञात दुचाकीस्वाराने मलाही तिकडेच जायचे आहे असे सांगून त्यांना विश्वासाने गाडीवर बसवले. गुंजाळवाडी शिवारात आल्यावर चोरट्याने गाडी थांबवून सावळेराम यांना खाली उतरवले व धक्काबुक्की करत त्यांच्या खिशातील १५,८०० रुपये बळजबरीने काढून घेतले. कोणाला बोलला तर खात्मा करीन, अशी जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी फरार झाला. फिर्यादी गणेश घुले यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## एसटीच्या 'एनसीएमसी' कार्डच्या नावाखाली लूट; १९९ रुपयांच्या कार्डसाठी ३०० रुपयांची वसुली

**घारगाव** : एसटी प्रवासात मिळणाऱ्या विविध शासकीय सवलतींचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने बंधनकारक केलेल्या 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड'च्या नावाखाली ग्रामीण भागात लूट सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शासनाने या कार्डसाठी केवळ १९९ रुपये शुल्क निश्चित केले असताना, घारगाव (ता. संगमनेर) येथील एका कॅम्पमध्ये खाजगी एजंटांकडून महिलांकडून तब्बल ३०० रुपये उकळले जात असल्याचा प्रकार जागरूक नागरिकांमुळे समोर आला आहे. शासकीय सवलत बंद होईल या भीतीने ग्रामीण भागातील महिला आणि ज्येष्ठ नागरिक हे कार्ड काढण्यासाठी मोठी गर्दी करत आहेत. याच हतबलतेचा गैरफायदा घेत काही खाजगी एजंट गावागावांत बेकायदेशीर शिबिरे आयोजित करत आहेत. घारगाव येथील कॅम्पमध्येही असाच प्रकार सुरू होता. १९९ रुपयांच्या कार्डसाठी ३०० रुपये वसूल केले जात असताना, काही सुजाण प्रवाशांनी आणि नागरिकांनी एजंटांना जाब विचारला. त्यावर समाधानकारक उत्तर न मिळाल्याने हा लुटमारीचा प्रकार चव्हाट्यावर आला. हे एजंट प्रति कार्ड १०० रुपये स्वतःच्या खिशात घालत असून, यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्रामीण प्रवाशांना नाहक भुर्दंड सोसावा लागत आहे. ग्रामीण भागातील प्रवाशांनी, विशेषतः महिलांनी अशा कोणत्याही अनधिकृत एजंटांच्या आमिषाला बळी पडू नये आणि जास्तीचे पैसे देऊ नयेत. जर कोणी अधिक रकमेची मागणी करत असेल, तर त्याची तक्रार थेट जवळच्या एसटी आगार व्यवस्थापकांकडे करावी, असे आवाहन व्यवस्थापकांनी केले आहे.

### *प्रवाशांसाठी महत्त्वाची माहिती....*

*अधिकृत शुल्क : एसटी महामंडळाच्या नियमानुसार या कार्डची किंमत जीएसटीसह केवळ १९९ रुपये आहे.*

*मिळेल येथे कार्ड : हे कार्ड केवळ तुमच्या जवळच्या एसटी बस डेपो (आगार) किंवा शासनाने नियुक्त केलेल्या अधिकृत केंद्रांवरच उपलब्ध आहे.*

*कारवाईचा नियम : परिवहन विभागाच्या स्पष्ट सूचनेनुसार, ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त रक्कम आकारणाऱ्या एजंट किंवा केंद्रांवर कठोर कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करण्यात येतील.*